



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक १७४ * नांदेड * सोमवार, दि. ३० जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# हिंदी संदर्भातील शासनाचे दोन्ही निर्णय रद्द

## डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यभरात हिंदी सक्तीवरून आणि त्रिभाषा सुत्रावरून वाद उफाळलेला असताना हिंदी सक्ती बाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रविवारी महाराष्ट्र मंत्रिमंडळाची बैठक पार पडली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हिंदी सक्ती बाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ हे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेत सांगितलं. यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एक नव्याने समिती तयार करण्यात येईल. त्रिभाषा सूत्रसंदर्भातील सगळं सूत्र माशेलकर समिती अभ्यासेल. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हिताचं जे असेल ते सूत्र राज्य सरकार स्वीकारेल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्याकरता मराठी आणि मराठी विद्यार्थी महत्त्वाचा. आमची नीतीही विद्यार्थी केंद्रित असेल. यात आम्हाला कोणत्याही प्रकारचा राजकारण करायचं नाही, असेही त्यांनी सांगितले.

आजच्या अधिवेशनाच्या या पूर्वसंध्येला आम्ही विरोधी पक्षाला चहापानासाठी बोलवलं होतं. परंतु नेहमीच्या पद्धतीने विरोधी पक्षाने चहापानावर बहिष्कार टाकला आहे. हा बहिष्कार टाकताना त्यांनी एक भलं मोठं पत्र दिलं आहे. पत्र मोठा असला तरी मजकूर फार नाही. मागच्या पत्रातीलच मुद्दे मोठ्या अक्षरात दिले आहेत .एक दोन नवीन विषय आहेत. मराठीचा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्याने विरोधकांच्या पत्रामध्ये व्याकरणाच्या २४ चुका आहेत. आजच्या पत्रावर भास्कर जाधव यांचे सही दिसत नाही. सह्यांमध्ये पाच तीन दोन झालं वडेट्टीवार रविवारी पत्रकार परिषदेत असं म्हणाले की, आमच्या कामांना स्थगिती मिळाली. त्यांना अजूनही उद्धव ठाकरे मुख्यमंत्री आहेत असं वाटतंय.

काल राज्यामध्ये आम्ही मराठी अनिवार्य केलं. हिंदी ऑप्शनल केलं. कोणतीही भारतीय भाषा शिकता येईल हा निर्णय आम्ही घेतला आहे. पण झोपलेल्याला उठवता येतं झोपेचा सोंग घेणाऱ्याला उठवता येत नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आधी कर्नाटकन लागू केलं . मध्यप्रदेश तेलंगणा नंतर उत्तर प्रदेशनं . २१ सप्टेंबर २०२० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे शैक्षणिक धोरण कशाप्रकारे लागू करायचं याविषयीची तज्ञ समिती नियुक्त केली होती. १६ ऑक्टोबरला त्याचा जीआर निघाला. नामवंत शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ लोकांची समिती नेमण्यात आली. यात अनेक विद्यापीठांचे कुलगुरू तसेच माजी कुलगुरू होते. १४ सप्टेंबर २०२१ ला या समितीने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना १०१ पानांचा अहवाल सादर केला. हा अहवाल स्वीकारताना उद्धवजी दिसतात. या



अहवालाच्या आठव्या प्रकरणात भाषेचा मुद्दा आला आहे.

इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्गापासून लागू करण्यात यावी अशी शिफारस यात करण्यात आली होती. पहिली ते बारावी विद्यार्थी इंग्रजी शिकतील तर त्यांना इंग्रजी भाषेची जाण येईल. आवश्यक पुस्तके वाचता येतील. यामुळे वैद्यकीय व अन्य तांत्रिक व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी ते सज्ज असतील. मराठी शिकवण्याला प्राधान्य द्यावेच लागेल पण त्याचवेळी इंग्रजी आणि हिंदी ही दुसरी भाषा पहिल्या वर्गापासून बारावीपर्यंत सक्तीची करण्यात यावी. गरजेचे असल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षातही या भाषा सक्तीच्या करण्यात याव्यात अशी शिफारस करण्यात आली.

# ५ जुलै रोजी मोर्चा होईल किंवा सभा, पण एकत्र जल्लोष करणार हे नक्की –उद्धव ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठी माणसाची शक्ती पाहून या सरकारने माघार घेतली, हिंदी सक्ती मागे घेतली. त्यामुळे हा मराठी एकजुटीचा विजय असल्याची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणून भाजपने सर्व प्रयत्न केले असंही ते म्हणाले. ५ जुलै रोजी विरोधाचा मोर्चा होणार होता. पण आता तो होणार नसून त्या ऐवजी विजयी मोर्चा किंवा जल्लोष सभा घेण्यासाठी चर्चा करू अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली. त्यामुळे ५ जुलै रोजी कार्यक्रम होणार हे स्पष्ट झालं आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, राज्यात पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. पण त्या विरोधात मराठी माणसाने एकजुट दाखवली. शिवसैनिक आणि इतर पक्ष, संस्थानी त्याला विरोध करत सरकारच्या जीआरची होळी केली. मराठी माणसाच्या दबावामुळे राज्य सरकारने हा जीआर रद्द केला. मराठी माणसाच्या शक्तीपुढे



सरकारची सक्ती हरली.

या आधी हिंदी सक्तीच्या विरोधात ५ जुलै रोजी ठाकरे बंधुंचा संयुक्त मोर्चा काढण्यात येणार होता. पण सरकारच्या जीआर रद्दच्या घोषणेनंतर हा मोर्चा निघणार नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं. पण ५ तारखेला विजयी मोर्चा काढायचा किंवा काही सभा घ्यायची का यावर विचार सुरू असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. ५ जुलै रोजी काहीतरी कार्यक्रम नक्की घेणार असंही ते म्हणाले. या संदर्भात मनसे, इतर पक्ष आणि मराठीच्या लढ्यात उतरलेल्या सर्व संस्थांशी चर्चा करणार असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले.

मराठी माणूस एकत्र येऊ नये यासाठी भाजपने प्रयत्न केला. पण मराठी एकजुटीसमोर त्यांना नमावे लागले. एकत्रित मोर्चा होऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केला. पण यापुढे संकट आल्यावर जागे व्हायचे असं नको. त्यामुळे ही एकजुट कायम राहावी असं उद्धव ठाकरे म्हणाले.

पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने मागे घेतला आहे. या संदर्भातील दोन्ही जीआर रद्द केल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करावे की नाही यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार आहे. ही समिती माशेलकर समितीचा अभ्यास करणार आणि त्यावर शिफारशी करणार आहे. त्यानंतर राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करावं की नाही याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

# उत्तराखंडमध्ये ढगफुटी, अनेकजण बेपत्ता

**डेहराडून (प्रतिनिधी)–** उत्तराखंडमध्ये शनिवारी रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने रौद्र रूप धारण केले आहे. राज्याच्या उत्तरकाशीमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे जनजीवन अस्तव्यस्त झाले असून अनेकजण बेपत्ता असल्याची माहिती पुढे आलीय.

यासंदर्भात बडकोटचे पोलिस अधिकारी दीपक कठेत यांनी सांगितले की, यमुनोत्री महामार्गावर ढगफुटी झाल्याची माहिती मिळाली होती. पथकाने घटनास्थळी पोहोचल्यावर पाहिले की, येथे रस्त्याच्या आणि इतर कामांमध्ये गुंतलेले काही लोक तंबू टाकून राहत होते. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे ते वाहून गेले आहेत. आतापर्यंत ८ ते १० जण बेपत्ता झाल्याची माहिती आहे. हे सर्व नेपाळी वंशाचे आहेत. तर उत्तरकाशीचे जिल्हाधिकारी प्रशांत आर्य म्हणाले की, शनिवारी मध्यरात्रीनंतर यमुनोत्री महामार्गावर पालीगाड ओजरी डाबरकोट दरम्यान ढगफुटी झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेत हॉटेलचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी राहणारे अनेक कामगार बेपत्ता झाले. यमुनोत्री मार्गावरही परिणाम झाला आहे. बेपत्ता मजुरांच्या शोधासाठी प्रशासनाचे पथक आणि एसडीआरएफकडून बचावकार्य सुरू असल्याचे आर्य यांनी सांगितले.

# ‘आता आरपारची लढाई; २९ ऑगस्टला मुंबईत धडकणार’

## ▸ मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचा पुन्हा एल्गार
## ▸ अंतरवालीत पार पडली मराठा समाजाची बैठक

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मैदानात उतरले आहे. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, आगामी आंदोलन मुंबईतच होणार आहे. हे आंदोलन निर्णायक ठरणार असून, मराठा समाजाच्या विजयाचा गुलाल उधळायचाच आहे, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केलाय. मुंबईतील हे आंदोलन आता फक्त मागणीचं नाही, तर निर्णय घेण्यासाठीचं असेल, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

जालन्यातील अंतरवाली सराटी येथे आज मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी राज्यव्यापी बैठक बोलावली होती. दुपारी बारा वाजता या बैठकीला सुरुवात झाली. बैठकीसाठी राज्यभरातून मराठा कार्यकर्ते अंतरवाली सराटीमध्ये दाखल झाले होते. या बैठकीत मराठा आरक्षणासह गेली दोन वर्षे मराठा समाजाला आंदोलन करून काय मिळालं? आणि आता काय मिळवायचं? या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. तसेच २९ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनाच्या नियोजनाबाबत देखील या बैठकीत चर्चा झाली.

या बैठकीनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. आपल्याला रणभूमीत उतरायचं आहे आणि विजयही निश्चित मिळवायचा आहे. रणभूमीची तयारी अशी असली पाहिजे की, यावेळी यश आपलंच असणार, असे ठाम शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आपल्याला कोणीही थांबवू शकत नाही. मैदान आपणच गाजवायचं असून, विजयाचा गुलालही आपल्या अंगावरच उधळला गेला पाहिजे. मागील दोन वर्षांपासून मराठा समाजासाठी आंदोलन सुरू असून, आता ही लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. ही शेवटची लढाई मराठ्यांनी जिद्दीने आणि एकजुटीने पार पाडली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी मराठा बांधवांना केले आहे.

# जगन्नाथ यात्रेत चेंगराचेंगरी; तीन भाविकांचा मृत्यू, अनेकजण जखमी

**ओडिशा (प्रतिनिधी)–** पुरी जिल्ह्यातील भगवान जगन्नाथ यांच्या रथयात्रेदरम्यान रविवारी सकाळी श्री गुंडीचा मंदिराजवळ झालेल्या चेंगराचेंगरीत किमान तीन भाविकांचा मृत्यू झाला आणि सुमारे १० जण जखमी झाले. पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास श्री गुंडीचा मंदिरासमोर रथावर विराजमान भगवान जगन्नाथ यांचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी जमली होती. यादरम्यान, धक्काबुक्की झाली आणि चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली.

पुरीचे जिल्हाधिकारी सिद्धार्थ एस स्वैन यांनी सांगितले की, या घटनेतील जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, त्यापैकी सहा जणांची प्रकृती चिंताजनक आहे. बसंती साहू, प्रेमकांत मोहंती आणि प्रवती दास अशी मृतांची नावे आहेत. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, घटनेचा तपास सुरू करण्यात आला आहे. आणि प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी आणि जखमींना मदत करण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.

# शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने शासनाच्या हिंदी सक्तीच्या जीआरची होळी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने हिंदी सक्तीच्या निषेधार्थ महात्मा फुले चौक आयटीआय येथे रविवार, दि. २९ जून रोजी दुपारी तीनच्या सुमारास हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करत आंदोलन करण्यात आले.




यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, जिल्हाप्रमुख भुजंग डक व महानगरप्रमुख प्रकाश मारामार यांच्यासह उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे, उपजिल्हाप्रमुख राम चव्हाण, उपजिल्हाप्रमुख सतीश उमरेकर, जिल्हासंघटक नरहरी वाघ, तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम, तालुकाप्रमुख नंदू पाटील वैद्य, शहरप्रमुख अर्जुन ठाकूर, शहरप्रमुख आनंद जाधव, शहरप्रमुख जितूसिंघ टाक, महानगरप्रमुख दक्षिण मनोज यादव, महानगर संघटक नवज्योतसिंघ गाडीवाले, विधानसभा प्रमुख हणमंत भवर, शहर संघटक पिंटू सुनपे, उपजिल्हासंघटक माधव पांचाळ, युवासेना जिल्हाप्रमुख अक्षय वट्टमवार, शहर प्रमुख रवी नागरगोजे, तालुका संघटक नवनाथ जोगदंड, दिलीप ठाकूर, उपतालुका प्रमुख हरी धुमाळ, उपशहर प्रमुख गणेश शहाणे, उपशहर प्रमुख मनोज काकडे, ज्ञानू डोनेकर, मोईज खान, प्रभाकर सोनटक्के, एकनाथ मोगरकर, सचिन पाटील, निवृत्ती जिंकलवाड, ब्रिजलाल उगवे, लक्ष्मणराव भोसले, शेख नदीम, शंतनू सावंत, ईश्वर भालेराव, सुमेध भुरे, वैभव गायकवाड, प्रकाश संपत्ते, दत्ता गायकवाड, करण इटकल, रोहित पांडे, अंकुर पटेल, शिवम आर्या, अंकित तेहरा, सूरज नवघरे, गोविंद यादव, सोनू नवघरे, गणेश शिंदे, सूरज फटले, मंगेश यादव, शैलेश रावत, गजानन शास्त्री आदींची उपस्थिती होती.

# दुचाकी वाहनांसाठी आता दोन हेल्मेटची सक्ती

**मुंबई (प्रतिनिधी)–** रस्ते अपघात कमी करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने दुचाकी वाहनांसाठी एक नवीन नियम लागू केला आहे. यापुढे दुचाकी वाहन उत्पादकांना वाहन विक्री करताना खरेदीदाराला दोन हेल्मेट देणे अनिवार्य करण्यात येणार आहे. यामुळे दुचाकीस्वार आणि त्याच्यासोबत प्रवास करणाऱ्या व्यक्तीलाही हेल्मेट घालणे सक्तीचे होणार आहे.

केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित केले आहेत. या नवीन अधिसूचनेनुसार, दुचाकी खरेदी करताना दोन हेल्मेट देणे बंधनकारक केले जाईल. ही अंतिम अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर तीन महिन्यांतच हा नवीन नियम लागू होईल. या बदलामुळे रस्त्यावर दुचाकी चालक आणि पाठीमागे बसलेल्या प्रवाशासाठीही हेल्मेट वापरणे अनिवार्य होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# आयपीएस पराग जैन भारताचे नवे ‘रॉ’ प्रमुख

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताची परकीय गुप्तचर संस्था म्हणून जगभरातही ख्याती असलेल्या रिसर्च अँड ॲनालिसिस विंग (Research and Analysis Wing (रॉ) या संस्थेची नवी धुरा आयपीएस अधिकारी पराग जैन यांच्याकडे सोपवली गेली आहे. १९८९ बँचचे अधिकारी पराग जैन हे ३० जून २०२५ पासून नवा पदभार स्विकारणार आहेत.



रवी सिन्हा यांच्याबदली आता जैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रवी सिन्हा यांचा कार्यकाळ ३० जूनला संपत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षांसाठी जैन यांची नियुक्ती सरकारने केली आहे. पराग जैन यांनी ऑपरेशन सिंदूर मध्ये बौद्धिक क्षमतेचा आधारे गुप्त माहिती गोळा केली होती. त्यांच्या या कामगिरीनंतर आता ‘रॉ’ची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. त्यांनी देशाच्या विविध पातळीवरील सुरक्षा यंत्रणेत काम केले आहे. त्यांचा प्रदिर्घ अनुभव पाहता त्यांची या पदावर वर्णी लागली आहे.









जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ


गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# जसे अन्न तसे मन!

जसे खावे अन्न तसे होईल मन. जसे प्यावे पाणी तसे होईल वाणी, ही म्हण आता केवळ तत्त्वज्ञानापुरती मर्यादित राहिलेली नाही. आजच्या बदलत्या जीवनशैलीत आणि अन्नसंस्कृतीत ही म्हण एका कठोर सत्याची जाणीव करून देते. भारतात लहान मुलांमध्ये वाढत चाललेला टाईप-२ डायबेटीस (मधुमेह) याच सत्याचा गंभीर संकेत देतो. पूर्वी प्रौढांमध्ये आढळणारा हा आजार आता लहान वयातच डोकावत आहे आणि त्यामुळे शालेय वयातील मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यावर उपाय म्हणून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने अर्थात सीबीएसईने घेतलेला पुढाकार स्वागतार्ह आहे. देशभरातील आपल्या २६,००० शाळांमध्ये साखर बोर्ड लावण्याचा आदेश त्यांनी दिला आहे. या फलकांवर रोजच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांतील साखरेचे प्रमाण, त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, तसेच पर्यायी आरोग्यदायी पदार्थांची माहिती दिली जाणार आहे. याचाच भाग म्हणून शाळेतील कॅन्टीनमधून चॉकलेट, बिस्किटं, सॉफ्ट ड्रिंक्स, पेस्ट्रीज यांसारखे साखर- आणि चरबीमुक्त खाद्यपदार्थ काढून टाकण्यात येणार आहेत. ही केवळ एक शाळा पातळी-वरील सुधारणा नसून, दीर्घकालीन आरोग्य धोरणा-चा एक भाग आहे. कारण चंदीगडच्या २०२३ च्या अभ्यासानुसार, भारतातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये १५.३५% मुलांना प्री-डायबेटीस असून ०.९४% मुलांना आधीच डायबेटीस आहे. ही आकडेवारी धक्कादायक असून, आरोग्य यंत्रणेसाठी एक इशारा आहे. कर्नाटक सरकारने देखील शालेय पोषण आहारातून गोड 'चिक्की' काढून टाकून त्याऐवजी केळी व अंडीचा समावेश केला आहे. अशा निर्णयांमुळे केवळ साखरेचे सेवन कमी होत नाही, तर मुलांच्या पोषणातही वाढ होते. सीबीएसईच्या या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये साखरेच्या सेवनाबाबत जागरूकता निर्माण करणे. केवळ नियम बनवून किंवा गोड पदार्थ बंद करून हा उद्देश पूर्ण होणार नाही. यासाठी पालक, शिक्षक, आरोग्य संस्था आणि स्थानिक समुदाय यांनीही सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. घरी मुलांना काय दिलं जातं, वाढदिवस किंवा सणासुदीला कोणते पदार्थ दिले जातात, याचेही आरोग्यावर परिणाम होतात. आज शाळांमध्ये केवळ शिक्षण दिलं जात नाही, तर चांगले जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या सवयीही घडवल्या जातात. त्यामुळे शाळा हेच परिवर्तनाचं केंद्र बनू शकतं. तिथंच आरोग्यदायी आहाराची आणि जबाबदारीची पायाभरणी झाली, तर भविष्यात अपोषण, लठ्ठपणा आणि मधुमेह यांसारख्या समस्या कमी होतील. या बदलांसोबतच सातत्यपूर्ण निरीक्षण आणि पुनरावलोकन यांची आवश्यकता आहे. शाळांमध्ये साखर बोर्ड लावणे ही केवळ एक सुरुवात आहे. याला साथ मिळाली पाहिजे आरोग्य शिक्षणाच्या उपक्रमांची, चाचण्या व तपासण्यांची, तसेच आरोग्यदायी जीवनशैलीसाठी केलेल्या कार्यशाळांची. या सगळ्या प्रयत्नांमध्ये सरकारचं आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचं सहकार्य जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच महत्त्व पालकांच्या भूमिकेलाही आहे. घरी आरोग्यदायी अन्न-पदार्थ देणे, मुलांना पाणी आणि नैसर्गिक फळांचे रस देण्याची सवय लावणे, गोड पदार्थांना पर्याय सुचवणे. हे सर्व बदल पालकांकडून सुरू होऊ शकतात. आयुष्याच्या सुरुवातीलाच जर चुकीच्या आहाराची सवय लागली, तर त्याचे दुष्परिणाम पुढील आयुष्यात दिसून येतात. वाढते वजन, वाढलेले कोलेस्टेरॉल, लवकरच येणारा मधुमेह ही सर्व लक्षणं आज मुलांमध्ये दिसू लागली आहेत, आणि म्हणूनच हा साखरेचा स्फोटक प्रश्न आता त्वरित हाताळण्याची गरज आहे. या निर्णयाचं कौतुक करत असतानाच, इतर शिक्षण मंडळांनीही या दिशेने पावलं टाकणं आवश्यक आहे. आरोग्य ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नाही, तर ती सामाजिक बांधिलकी आहे. आपल्या मुलांचं आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आपण सर्वांनीच एकत्र येऊन ही चळवळ अधिक प्रभावीपणे राबवली पाहिजे. तत्काल पावलं उचलणं अत्यावश्यक आहे, कारण आरोग्याचा बुडबुडा फुटण्याआधी त्यावर उपाय करणे हेच दूरदृष्टीचं आणि सुज्ञतेचं लक्षण आहे.

# तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख। पाहिन श्रीमुख आवडीने।।



भूतलावरील प्रत्येक व्यक्ती सुखाच्या शोधात आहे. प्रत्येकाचं सुख एक वेगळं आहे. काहींचे सुख संपत्तीमध्ये आहे, काहींचे सुख वस्तूमध्ये आहे, काहींचे सुख संपत्तीच्या संचयामध्ये आहे, तर काहींचे सुख रिकामा वेळ घालविण्यामध्ये आहे.

थोडक्यात सुखाची संकल्पनाही व्यक्तीनुसार आणि काळानुसार बदलणारी आहे. परंतु सर्व सुखाचे साधन जर आपल्याला शोधावयाचे झाले तर सर्व सुख हे विठ्ठल परमात्माच्या मुख-कमलाच्या दर्शनामध्ये आहे. या सुखाला काळ आणि वेळ याचे कुठलेही बंधन नाही. हे सुख कालमर्यादित किंवा संपणारे नाही. सुखाचा आगर असणाऱ्या पांडुरंग परमा-त्माचे वर्णन करताना जगद्गुरु संत तुकाराम महाराज अभंगाच्या पहिल्या चरणामध्ये म्हणतात की,

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ।।

पांडुरंग परमात्मा सुंदर अशा ध्यानावस्थेमध्ये विटेवर उभा असून, त्यांनी कमरेवर हात ठेवलेले आहे. कुठे आणि कशा पद्धतीने भगवान पांडुरंग उभे आहेत? याचं वर्णन जगद्गुरू संत तुकाराम महाराज करताना... पुढे पांडुरंग परमात्माच्या गळ्यामध्ये तुळसीची माळ असल्याचे सांगतात आणि त्यांनी पितांबर परिधान केलेला आहे, असे वर्णन करतात. असे हे भगवान विठ्ठलाचे रूप मला नेहमी आवडते. भगवान पांडुरंग हे विष्णूचे अवतार असल्याच्या खुणा या अभंगां-मध्ये आपल्याला सापडतात. जसे आपणांस माहीत आहे की, पितांबर, तुळशीचा हार, मकरकुंडले कौस्तुभमणी ह्या वस्तू भगवान विष्णूलाही अतिप्रिय आहे. असं हे रूप जगद्गुरू संत तुकाराम महाराजांना आवडते. असे संत तुकाराम महाराज अभंगाच्या दुसऱ्या चरणात सांगतात की,

तुळसीहार गळां कासे पितांबर।
आवडे निरंतर तेंचि रुप ।।

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांनी भगवान विठ्ठलाच्या रूपामध्ये आणि भगवान विठ्ठलाच्या नामस्मरणामध्ये सर्व सुख असल्याचे म्हटले आहे. एखाद्या सुंदर वस्तूचे मनापासून आपण जर वर्णन केले तर, मनाला आनंद प्राप्त होतो. त्याच-प्रमाणे भगवान विठ्ठलाचे रूप पाहून या रूपाचे वर्णन करताना सुखाची अनुभूती आपल्याला आल्याशिवाय राहणार नाही. भगवान पांडुरंग परमात्म्याच्या रूपाचे वर्णन करताना पांडुरंगाच्या कानात माशाच्या आकाराची कुंडले चमकत असून, त्यांच्या गळ्यामध्ये कौस्तुभमणी विराज-मान असल्याचे वर्णन जगद्गुरू संत तुकाराम महाराज अभंगाच्या तिसऱ्या चरणात करतात की,

मरकुंडले तळपती श्रवणीं।
कंठी कौस्तुभमणी विराजीत।।

असे हे सुंदर ध्यान अवस्थेमध्ये विटेवर उभे अस-लेले, कडेवर हात असलेले, पितांबर परिधान केलेले, माशाच्या आकाराची कुंडले कानांत असलेले, आणि ज्यांच्या गळ्यात कौस्तुभमणी आहे, असे हे भगवान पांडुरंग परमात्मा हेच माझे सर्व सुख असून त्यांचे मुख नित्यनियमाने आवडीने पाहीन असे जगद्गुरू संत तुकाराम महाराज अभंगाच्या शेवटच्या चरणामध्ये म्हणतात की,

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख ।
पाहिन श्रीमुख आवडीने ।।

संसारामधील सर्व सुख परिपूर्ण असतील असे नाही, परंतु पारमार्थिक सुख हे परिपूर्ण असून शाश्वत स्वरूपाचे असते. संसारातील क्षणभंगुर सुख उपभोगताना शाश्वत सुखाचे वारकरी होण्यासाठी आपल्याला नित्य-नियमाने भगवान विठ्ठल परमात्म्याच्या नामस्मरणातून आणि विचार दर्शनातून जीवनरुपी वारीची वाटचाल करावी लागेल.

**-भगवान राईतकर**
संत साहित्याचे अभ्यासक व व्याख्याते
विवेकानंद नगर, मेहकर
मो.९७३०३३२१५१

# लहान ग्रहांना लघुग्रह म्हणायची प्रथा!

आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिवस हा वार्षिक जागतिक कार्यक्रम आहे जो १९०८ मध्ये तुंगुस्का घटनेच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केला जातो, जेव्हा एक लघुग्रह सुमारे २,१५० चौरस किमी- ८३० चौ. मैल सायबेरियातील जंगलात समतल होता. तो संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या ठरावात दरवर्षी ३० जून रोजी जागतिक स्तरावर पाळण्याची घोषणा केली आहे. लघुग्रह दिनाचे उद्दिष्ट लघुग्रहांबद्दल जागरुकता वाढवणे, पृथ्वी व तिचे कुटुंब, समुदाय आणि भविष्यातील पिढ्यांचे आपत्तीजनक घटनेपासून संरक्षण करण्यासाठी काय केले जाऊ शकते? हे आहे. ज्ञानवर्धक संकलित लेख कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी खास वाचकांसाठी मांडला आहे.

लघु म्हणजे लहान आणि सूर्याभोवती फिरणाऱ्या या ग्रहांना लघुग्रह असे नाव आहे. स्वत:च्या गुरुत्वाकर्षणाखाली गोलाकार होण्यासाठी या वस्तूंचे वस्तुमान पुरेसे नसल्याने, लघुग्रह अनियमित आकाराचे राहिले आहेत. लघुग्रहांचे आकार धूलीकणांपासून ते शेकडो किलोमीटर आकाराच्या टेकडी, डोंगर, पर्वता एवढे जरी असले, तरी यातल्या एक मीटरहून लहान आकाराच्या वस्तूंना अशनी किंवा उल्का- मिटिअरॉइड म्हणतात. एक मीटरपेक्षा अधिक लांब-रुंद ग्रहांनाच लघुग्रह म्हणायची प्रथा आहे. पण सेरीस या सर्वांत मोठ्या लघुग्रहाला बटुग्रह किंवा खुजाग्रह अशा



एका वेगळ्या गटांत आता सामील केले गेले आहे. लघुग्रह संख्येने कोट्यावधी असले, तरी मार्च २०२०पर्यंत आंतराष्ट्रीय खगोलशास्त्र संघ- आय.ए.यू. इंटरनॅशनल स्ट्रॉनॉमी युनियनच्या यादीत नावानिशी नोंद केलेले, ज्यांची कक्षा, आकार आणि वर्णपटावरून अंदाजे रासायनिक जडणघडण माहीत झालेले, एकूण नऊ लाख सत्तावन हजार सातशे बेचाळीस लघुग्रह ज्ञात आहेत. बहुसंख्य लघुग्रहांच्या सूर्याभोवती असलेल्या परिभ्रमण कक्षा सर्वसाधारणपणे मंगळ आणि गुरू ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यान आहेत. त्यामुळे या जागेला लघुग्रहांचा पट्टा असे म्हणतात. काही लघुग्रह गुरूच्याच कक्षेत त्याच्या पुढे आणि मागे आहेत. यांना ट्रोजन-लघुग्रहांचा गट म्हणतात. काही लघुग्रह नेपच्यून ग्रहाच्या कक्षेपलीकडेही आहेत. त्यांना लघुग्रहांचा क्यूपर-पट्टा असे म्हणतात. काही लघुग्रहांच्या विकेंद्री कक्षा पृथ्वीकक्षेला छेदून जाणाऱ्या आहेत. त्यांचे अपसूर्य स्थान- लंबवर्तुळाकार कक्षेतील ग्रहांचे सूर्यापासून सर्वात दूरचे स्थान; याला अपसूर्य बिंदू असे म्हणतात, जरी मंगळापलीकडचे असले, तरी उपसूर्य स्थान- लंबवर्तुळाकार कक्षेतील वस्तूचे सूर्यापासून सर्वात जवळचे स्थान; याला उपसूर्य बिंदू असे म्हणतात; शुक्राच्या कक्षेहूनही कित्येकदा कमी असते. अशा लघुग्रहांना पृथ्वीसमीप-लघुग्रह गट असे आता नव्याने संबोधण्यात येते.

लघुग्रहांचे साधारणतः तीन प्रकार पडतात- १. कार्बन बहुलता असणारे, २. सिलिकेटने बनलेले, ३. धातूंची बहुलता असणारे. सूर्य आणि ग्रहमाला ज्या आंतरतारकीय रेणवीय मेघापासून निर्माण झाले, त्या मेघातून त्याचवेळी लघुग्रहांची निर्मिती झाली असावी. मंगळ आणि गुरू ग्रहांच्या गुरुत्वीय आकर्षणामुळे येथे एक मोठा ग्रह निर्माण होऊ शकला नसावा, अशी लघुग्रह निर्मितीबाबत संकल्पना आहे. प्रत्येक लघुग्रहाचे परिवलन वेगवेगळ्या गतीने चालू आहे आणि प्रत्येकाच्या आसाची दिशाही निरनिराळी आहे. लघुग्रह हे मोठे खडक आहेत, जे सूर्याभोवती फिरतात. ४.६ अब्ज वर्षांपूर्वी आपल्या सूर्यमालेच्या जन्मादरम्यान हे अंतराळ दगड तयार झाले. सूर्यमालेच्या सुरुवातीच्या काळात धूलिकणांचे गुच्छ बनले. प्लॅनेटेसिमल म्हणून ओळखले जाणारे हे गठ्ठे त्यांच्याद्वारे अधिक धूळ आकर्षित करून मोठे आणि मोठे झाले, गुरुत्वीय क्षेत्रे बनले. यापैकी काही इतके मोठे झाले की ते ग्रह बनले. इतर लघुग्रह बनले. काही लघुग्रह इतर लघुग्रहांशी आदळले आणि लहान तुकडे झाले, तर काही मोठे राहिले. सर्वात मोठे लघुग्रह अनेक मैल मोजू शकतात. उदाहरणार्थ, ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी डायनासोर नष्ट करणारा लघुग्रह सात मैल पसरला होता.

आपल्या सौरमालेमध्ये दोन लघुग्रह महामार्ग आहेत. गुरू आणि मंगळ यांच्यातील मुख्य लघुग्रह पट्टा आणि नेपच्यूनच्या कक्षेबाहेर फिरणारा कुईपर बेल्ट. नासाच्या मते एकट्या मुख्य लघुग्रह पट्ट्यात १.१ ते १.९ दशलक्ष लघुग्रह आहेत. लहान लघुग्रह पृथ्वीच्या वातावरणात नेहमीच प्रवेश करतात, परंतु सहसा ते जळून जातात. ग्रहव्यापी आ-पत्ती निर्माण करणारे प्रचंड लघुग्रह अत्यंत दुर्मिळ आहेत. याचे कारण असे की गुरूचे गुरुत्वाकर्षण खेचणे, जे पृथ्वीपेक्षा ११ पट रुंद आहे, ते आपल्या ग्रहावर पोहोचण्यापूर्वी त्यांना शोषून घेते. तथापि, फुटबॉल मैदानाच्या आकाराचे मोठे लघुग्रह अधूनमधून आत सरकतात, दर २,००० वर्षांनी एकदा. जेव्हा हे लघुग्रह आद-ळतात, तेव्हा ते सहसा ज्या भागात उतरतात त्याच भागाचे नुकसान करतात. तथापि, ते महासागरात उतरल्यास त्सुनामीला चालना देऊ शकतात, ज्यामुळे किनारी भागांचा नाश होऊ शकतो. लघुग्रह आपल्याला इतका धोका देत नाहीत, आपण अद्याप त्यांच्यासाठी तयार असणे आवश्यक आहे. म्हणूनच तुंगुस्का स्फोटाच्या स्मरणार्थ दर ३० जून रोजी आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिन साजरा केला जातो, जो २,००० चौरस किलो-मीटर नष्ट केले. रशियातील तुंगुस्का येथील वाळवंट खूप महत्त्वाचे आहे. या दिवसा-ची स्थापना २०१६मध्ये युनायटेड नेशन्सने लघुग्रहांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि आपल्या ग्रहाचे त्यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी केली होती, हे लक्षात घ्यावे. विश्व लघुग्रह दिवसानिमित्त सर्वांना शुभेच्छा.

**-कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली.
मो. ७१३२७९६६८३

# वाढती बालगुन्हेगारी; धोक्याची घंटा

क्रिकेट खेळण्याच्या किरकोळ वाद-ातून आठवीतील विद्यार्थ्याने नववीतील विद्यार्थ्याचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर शहरातील नामांकित शाळेत घडली. या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. गेल्याच वर्षी शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात घडली होती. दोन वर्षांपूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. तीन वर्षांपूर्वी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात, याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे.

सन २०२२-२३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून, पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात एका वर्षात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलीस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यांसारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत.

गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हटले जाते. त्यांचे आई-वडील मोलमजुरीसाठी घराबाहेर राहतात. त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत. परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात, असा तर्क काढला जातो. पण अहिल्यानगरमधील या व आधीच्या घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे मुले त्या त्या शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांची मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागली आहेत.

लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई, वडिलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाएवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहेत ही चिंतनीय बाब आहे. याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते, पण एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाला आणि बाल-गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठमोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात, पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते.

त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी, आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई-वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात. अशा-वेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्हीवरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# उपक्रमशील मुख्याध्यापक बालाजी हंगरगे

राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वसंतनगर नांदेड येथील मुख्याध्यापक बालाजी मारोतीराव हंगरगे हे नियत वयोमानानुसार आज ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा जन्म तेलंगणा व कर्नाटक सीमेनजिक श्रीक्षेत्र पूर्वरिश्वर हेमाडपंथी मंदिराच्या परीक्षेत्रातील देगलूर तालुक्यामधील करडखेड या गावी मारोतीराव व सौ. पार्वतीबाई या दाम्पत्याच्या पोटी १५ जून १९६७ रोजी झाला.



चार भाऊ व एक बहिणीमध्ये ते सर्वात कनिष्ठ पुत्र आहेत. प्राथमिक शिक्षण मूळगावी जिल्हा परिषदेच्या शाळेत पूर्ण झाले. माध्यमिक शिक्षण देगलूर येथील साधना हायस्कूलमध्ये झाले. उच्च माध्यमिक व बी.एस्सी. चे शिक्षण यशवंत कॉलेज नांदेड येथून झाले, तर व्यावसायिक शिक्षण बी.एड. शासकीय महाविद्यालय नांदेड येथून पूर्ण झाले.

हंगरगे सरांना एक सवय म्हणजे एकदा पायावर पाय टाकून पदमासनामध्ये बसले की तासन्तास बसून राहणे. सरांनी एखादा विषय चर्चेला घेतला तर त्याच्या खोलात जाऊन समजावणं, सर आणि सौ. वृषाली वहिनी यांच्याकडे अनेक लोक आर्थिक नियोजन, घराचे कन्स्ट्रक्शन या बाबत सल्लामसलत करायला यायचे. त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये म्हणजे अतिशय मनमिळावू, सतत हसतमुख, मदतीला धावून जाणारं व्यक्तिमत्त्व. त्यांना लहान मुलं अतिशय प्रिय आहेत. साने गुरूजींनी म्हटले आहे, 'करील मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयांचे' तसे सर सातत्याने शाळेतील मुलांमध्ये रममान होत असतात. त्यांच्या आयुष्यातील मला भावलेली आणखी एक गोष्ट म्हणजे वैशाली या मुलीचे (विद्यार्थिनीचे) स्वत:च्या मुलीप्रमाणे शिक्षण पूर्ण केले. एवढेच नव्हे तर तिच्या विवाहाचा संपूर्ण खर्च हंगरगे सर आणि रोडगे सरांनी उचलला. यातून ते किती दानशूर आणि उदार मनाचे आहेत, हे समजते. सेवानिवृत्ती म्हणजे सेकंड इनिंग. सेवानिवृत्तीनंतरचे आरोग्य आपणांस सुखमय आणि आनंददायी जावो, ही शुभकामना!

**डॉ. माणिक गाडेकर**
सहशिक्षक
राजर्षी शाहू विद्यालय, नांदेड

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मुख्याध्यापक बालाजीराव हंगरगे



मराठवाडा शिक्षण संस्था संचालित राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वसंतनगर, नांदेड ह्या ज्ञानमंदिरात मुख्याध्यापक तथा प्राचार्य बालाजी मारोतीराव हंगरगे हे दि. ३० जून २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

हंगरगे यांचा गणित विषयाचे तज्ज्ञ अध्यापक म्हणून नावलौकिक आहे. त्याचबरोबर शाळेतील वेळापत्रकापासून ते ऑनलाईन पोर्टलवरील शाळेची सर्व कामे करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या या कार्यतत्परतेमुळेच धनगरवाडी बीटमध्येच काय संपूर्ण नांदेड जिल्ह्यात ऑनलाईन कार्यात त्यांची शाळा नेहमीच अग्रणी राहिली आहे. तसेच शाळेच्या कोणत्याही कार्यात त्यांनी अनेक शाळेच्या मुख्याध्यापकांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

शाळेतील माजी विद्यार्थी जे.यू.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. तसेच उच्च शिक्षित होऊन डॉक्टर, इंजिनिअर इ. अनेक क्षेत्रात यशस्वीपणे उच्चपदांवर कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत त्यांना सन्मानाने बोलावून मार्गदर्शन शिबीर सुरू केले. ज्यामुळे शाळेतील विद्यार्थी अशा उद्बोधनातून प्रेरणा घेऊन जीवनात यशस्वी होतील, त्याचबरोबर विद्यार्थी सुरक्षेबाबत उपाययोजना व अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यामध्ये वाहतूक सुरक्षा योजना, दामिनी पथक मार्गदर्शन शिबीर अशा काही उपाययोजनांचा उल्लेख करावा वाटतो.

एक मुख्याध्यापक म्हणून त्यांनी नेहमीच सहकाऱ्यांना आदराची वागणूक दिली. हंगरगे सरांचे गुणगौरव माझ्यासारख्या पामराला शब्दामध्ये मांडणे अशक्य. सरांसारखे तज्ज्ञ शिक्षक व मुख्याध्यापक लाभणे ही राजर्षी शाहू विद्यालयाच्या सुवर्ण इतिहासात एक यशस्वी मुख्याध्यापक म्हणून नोंद होवो. हंगरगे सरांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचे जीवन सुखमय जावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**-शिवानंद टापरे**
सहशिक्षक
राजर्षी शाहू विद्यालय, नांदेड

# एक आदर्श शिक्षक-एन. डी. गाडवे

सकारात्मक दृष्टिकोन, स्वयंशिस्त, स्वावलंबी, विनोदी, हजरजबाबी, विद्यार्थीप्रिय आदी सर्वगुणसंपन्न पानसरे कनिष्ठ महाविद्यालय अर्जापूर येथील अर्थशास्त्र व सहकार विषयाचे प्राध्यापक नारायण ज्ञानोबा पाटील गाडवे हे नियत वयोमानानुसार ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत आहेत. सृष्टीचा नियम आहे,



'मनाने दिलदार, बोलणं दमदार, वागणं जबाबदार, कामात खबरदार, नेतृत्त्व शानदार' अशी ज्यांची ओळख आहे, असे नारायणराव गाडवे यांचा जन्म पवित्र आषाढी एकादशीच्या दिवशी दि.१७ जून १९६७ रोजी जांब (बु.) ग्राम पंचायत अंतर्गत गाडवेवाडी ता.मुखेड येथे एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात, वडील वारकरी सांप्रदायातील कीर्तनकार हभप ज्ञानोबा महाराज वाडीकर व आई सौ. रुक्मीनबाई यांच्या पोटी झाला. एका समृद्ध व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही, अत्यंत बिकट व हलाखीच्या परिस्थितीत बालपणापासूनच होऊ लागली.

गाढडे यांचे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण, गावातील मारोती मंदिराच्या पारावरच गाडवेवाडी येथे त्यांच्या जन्म गावीच झाले. इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण नीतीनिकेतन विद्यालय जांब (बु.) येथे झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण बी. ए. व एम. ए.(अर्थशास्त्र) यशवंत महाविद्यालय नांदेड येथून पूर्ण केले. शारदा भवन सोसायटी नांदेड येथूनच बी. एड. झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लगेच यशवंत महाविद्यालय नांदेड येथे अर्थशास्त्र विषयाचे शिक्षक म्हणून प्रथम नियुक्ती मिळाली. साधारणतः दीड वर्ष अध्यापनाची सेवा यशवंत महाविद्यालयामध्ये झाली. नंतर हुतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या पावन पवित्र स्मृतीने पुनित झालेल्या, अर्जापूर सारख्या ग्रामीण भागात, पानसरे कनिष्ठ महाविद्यालय येथे सरांची कायम नियुक्ती झाली.

अर्थशास्त्रासारखा सांख्यिकी अवघड व क्लिष्ट समजला जाणारा विषय अगदी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजेल अशा विविध दैनंदिन उदाहरणाच्या माध्यमातून आपल्या विनोदी शैलीतून शिकवित असे. तसेच सुरुवातीच्या काळात काही कालावधी बिलोली येथे वास्तव्यास असताना विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरी अर्थशास्त्रातील संख्याशास्त्राचा भाग विनामूल्य व वैयक्तिक वेळ देऊन शिकविले, त्यामुळे विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयात गोडी निर्माण झाली. उत्तम आरोग्य लाभो व भावी आयुष्य आपल्या परीवारासोबत आनंदात जावो, एवढी श्री पंढरीनाथाच्या चरणी प्रार्थना करतो.

**-प्रा. शिवकुमार सरकोंडावार**

## थोडक्यात...

### मनपातील लिपीक नरसिंह कुलकर्णी सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड महापालिकेच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयातील वसुली लिपीक नरसिंह कुलकर्णी ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या उपस्थितीत



कर्मचाऱ्यांच्यावतीने त्यांना निरोप देण्यात आला. नरसिंह कुलकर्णी १९९५ साली सेवकपदी रुजू झाले. प्रारंभी लेखा विभागात आवक जावक विभागात होते. कालांतराने क्षेत्रीय कार्यालय क्रं. ५ येथे व सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे वसुली लिपीक म्हणून त्यांनी सेवा बजावली आहे. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर, शेख शादुला, मारोती सारंग यांची उपस्थिती होती.

### इंदिरा गांधी विद्यालयात राजश्री शाहू जयंती साजरी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– इंदिरा गांधी विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती गुरुवारी दि. २६ जून रोजी साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे अध्यापक जी. एम. शिंदे, उपमुख्याध्यापिका महाराज व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमात शिक्षकांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक एम. टी.कदम, प्राथमिकचे ज्येष्ठ शिक्षक कल्याणकर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. अथर्व गायकवाड याने राजश्री शाहू महाराजांच्या वेशभूषा केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. पडोळे यांनी केले.

# आ. केराम यांच्या तक्रारीनंतर किनवटच्या रेल्वे भुयारी पुलाची अधिकाऱ्यांनी केली पाहणी

**किनवट (प्रतिनिधी)**– शहरातील शिवाजीनगर परिसरात सुरू असलेल्या रेल्वे भुयारी पुलाच्या चुकीच्या कामावरोधात आ. भीमराव केराम यांनी अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार केली होती. या प्रकरणाच्या सुनावणीनंतर शनिवारी दि. २८ रोजी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी भुयारी पुलाची पाहणी केली. पाहणीनंतर अधिकाऱ्यांनी आ. केराम यांच्या तक्रारीत तथ्य असल्याचे मान्य केले. परंतु, सुधारणेच्यादृष्टीने कोणताच ठोस निर्णय झाला नाही.



किनवटच्या शिवाजीनगर परिसरात गेल्या सहा महिन्यांपासून भुयारी पुलाच्या निर्माणाचे काम सुरू आहे. या भुयारी पुलाशी जवळपास २० गावांसह अर्ध्या शहराचा संबंध येतो. त्या मानाने पुलाची उंची अरूंद आहे. पक्का पर्यायी रस्ता न देता रेल्वे विभागाने पुलाचे काम हाती घेतले. वास्तविक भुयारी पुलाच्या आधी उड्डाण पूल उभारणे गरजेचे होते. एकूणच या भुयारी कामाच्या विरोधात आ. भीमराव केराम यांनी रेल्वे मंत्रालयासह नवी दिल्लीच्या राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे तक्रार केली. याप्रकरणी गुरुवारी दि.२६ सुनावणी झाली. त्यानंतर आयोगाचे अन्वेषक गोवर्धन मुंडे यांच्यासह रेल्वे, बांधकाम विभाग, पालिका, महसूलच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी आ. भीमराव केराम यांच्या उपस्थितीत पुलाची पाहणी केली. यावेळी आ. केराम यांच्यासह उपस्थितीत नागरिकांनी अधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडीमार केला. निर्माणाधीन पूल व सुभाषनगरच्या पुलाची पाहणी केल्यानंतर अधिकाऱ्यांनी आ. केराम यांच्या तक्रारीत तथ्य असल्याचे मान्य करीत चुकीचे खापर पालिका प्रशासनावर फोडले. सप्टेंबर अखेरपर्यंत हा पूल वाहतुकीसाठी खुला होईल, असे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. अधिकारी पाहणीचा अहवाल आयोगाला सादर करणार आहेत. दि.२१ जुलै रोजी आयोगाकडून या पुलाबाबत अंतिम निर्णय येण्याची शक्यता आहे. पाहणीसाठी रेल्वेचे सहायक डीआरएम आर. के. मीना, व्ही. सतीशकुमार यांच्यासह किनवटचे सहायक जिल्हाधिकारी झेनीत चंद्रा दोन्तुला, तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर, डीवायएसपी रामकृष्ण मळघणे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, बांधकाम विभागाचे उपअभियंता झरीकर, नायब तहसीलदार बालाजी फोले आदींची उपस्थिती होती.

# हिंदी भाषा सक्ती प्रकरणी मनसेचा शनिवारी मुंबईत मोर्चा

## मराठी भाषिकांना सहभागी होण्याचे जिल्हाध्यक्ष विनोद पावडे, मॉन्टीसिंघ जहागीरदार यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्यात पहिलीपासून हिंदी भाष सक्तीचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वात ५ जुलैला गिरगाव चौपाटीवरून मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात नांदेड जिल्ह्यातील मराठी भाषिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मनसेचे जिल्हा अध्यक्ष विनोद पावडे आणि जिल्हाध्यक्ष मांटीसिंग जहागिरदार यांनी केले आहे. यावेळी शहर अध्यक्ष अब्दुल शफीक, मनविसे जिल्हाध्यक्ष अनिकेत परदेशी, दीपक स्वामी, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष संतोष सुनेवाड आदींची उपस्थिती होती.

पावडे आणि जहागिरदार संयुक्तरित्या म्हणाले की, राज्यात मराठी माणसाचा विकास करण्याऐवजी मराठी माणसांवर दिल्लीच्या इशाऱ्यावरून काहीही निर्णय लादण्याचे काम सध्या सरकारकडून सुरू आहे. ज्या शाळांमध्ये मराठी नीट शिकवली जात नाही. आता त्या शाळांमधून हिंदीची सक्ती करण्यात आली आहे. पहिलीपासूनचा मराठी सक्तीचा निर्णय हा मराठी भाषेवरचा आणि मराठी भाषिकांवरचा अन्याय आहे. हा अन्याय महाराष्ट्र नवनिर्माण सेना सहन करणार नाही, अशी भूमिका मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यापूर्वीच घेतलेली आहे. त्यामुळे हिंदी सक्ती प्रकरणी ५ जुलै रोजी मुंबईत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा कोणत्याही पक्षाच्या झेंड्याखाली काढण्यात येणार नाही तर हा मोर्चा मराठी भाषेसाठी आणि मराठी अस्मितेसाठी काढण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातूनही हजारो मराठी भाषिकांनी आपल्या मराठी भाषेची अस्मिता जपण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आणि मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष विनोद पावडे यांनी केले आहे.

दरम्यान नांदेड मधून ५० ट्रॅव्हल्स मधून आणि नांदेडहून मुंबई जाणाऱ्या अनेक रेल्वे गाड्यातून मनसेचे सैनिक, विद्यार्थी सेनेचे, महिला आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते ५ जुलैच्या मोर्चात सहभागी होण्यासाठी जातील, अशी माहितीही त्यांनी दिली.




**नांदेड–** साहित्य अकादमी पुरस्कार विजेते डॉ. सुरेश सावंत आणि राज्य शासनाच्या वृत्त छायाचित्रकार पुरस्काराचे मानकरी सचिन मोहिते यांचा सत्कार भाजपा महानगर कार्यालयात करण्यात आला. यावेळी महानगराध्यक्ष माजी.आ.अमरनाथ राजूरकर, विजय येवनकर, शीतल खांडील, विजय गंभीरे, तुळजाराम यादव, व्यंकटेश साठे, सुनील राणे, अमित वाघ, भालचंद्र पवळे, किशन कल्याणकर, नागनाथ गड्डम व पदाधिकारी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराज मानधन योजनेसाठी पात्र-अपात्र यादी जाहीर

## हरकती नोंदविण्यासाठी १० जुलै मुदत

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषदच्या ग्रामपंचायत विभागामार्फत राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व वृध्द कलावंत मानधन योजना २०२४-२५ अंतर्गत पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. योजनेसाठी जिल्ह्यातून १ हजार ४३२ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ९५४ अर्ज पात्र तर ४७८ अर्ज अपात्र ठरले आहेत.

लाभार्थ्यांची पात्र-अपात्र यादी जिल्हा परिषदेच्या संकेस्थळावर व सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात आली आहे. अपात्र ठरविण्यात आलेल्या अर्जदारांना हरकती व दावे सादर करण्याची संधी देण्यात आली. त्यासाठी ५ जुलै पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ७ जुलै रोजी सुधारित यादी तयार केली जाईल. अंतिम पात्र लाभार्थ्यांची यादी १० जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती ग्राम पंचायत विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे यांनी दिली आहे.

अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती अथवा दावे विचारात घेतले जाणार नाहीत. त्यामुळे ज्या अर्जदारांचे अपात्र यादीत आपले नाव आले आहे, त्यांनी वेळेत आवश्यक कागदपत्रांसह आपली माहिती सादर करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.



**नांदेड** – बालसाहित्यासाठी साहित्य अकादमीचा पहिला पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक तथा शिक्षण तज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांना मिळाला आहे. त्यामुळे अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी डॉ. सुरेश सावंत यांच्या निवासस्थानी जाऊन सत्कार केला.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना धनादेशाचे वाटप




**किनवट (प्रतिनिधी)** – नापिकी, बँकेचे कर्ज अशा कारणांनी आत्महत्या केलेल्या तालुक्यातील ७ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना दि.२७ तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या हस्ते प्रत्येकी ७० हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले.

कधी अतिवृष्टी तर कधी अनावृष्टी अशा निसर्गाच्या चक्रात सततची नापिकी व बँका, खासगी सावकारांचे कर्ज कसे फेडावे, या विवंचनेत ७ अल्पभूधारक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मासिक प्राप्ती योजनेतंर्गत येथील तहसील कार्यालयाच्यावतीने शुक्रवारी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. लाभार्थ्यांमध्ये ललिता भगवान गजभारे, शकुंतला जयराम राठोड, भाऊ बन्सी राठोड, जयश्री गजानन जाधव, पूजा लक्ष्मण शिरगिरे,बालाजी फुलाजी चिकराम व सोमाप्रिती सुरेंद्ररेड्डी एल्मावार यांचा समावेश आहे.

# रात्री उशीरापर्यंत सुरू राहणाऱ्या हॉटेल, पानटपरी चालकांवर कारवाई करा –रऊफ जमिनदार

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील काही भागात रात्री उशीरापर्यंत हॉटेल, चहा टपरी, पानटपरी हे सुरू असल्यामुळे गुन्हेगारी घटना घडत आहेत. त्यामुळे उशीरापर्यंत सुरू असणाऱ्या या आस्थापनांवर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष रऊफ जमिनदार यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



नांदेड शहरातील वाढती गुन्हेगारी ही सर्व सामान्यांसह पोलिसांचीही डोकेदुखी वाढणारी ठरत आहे. शहरातील काही भागात रात्री उशीरापर्यंत हॉटेल्स सुरू असतात. काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे युवक रात्री उशीरा गुन्हेगारीच्या घटना करून या सुरू असलेल्या आस्थापनात आश्रय घेत असतात. शिवाय याच हॉटेलमध्ये शुल्लक कारणावरून वाद होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे शहरात कायदा, सुव्यवस्था शांततेत राहावा यासाठी पोलीस विभागाने रात्री उशीरापर्यंत सुरू असणारे हॉटेल, चहाटपरी, पानटपरी यांच्यावर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले.

यावेळी ॲड. बाळू नरवाडे, नईम खान, निखील नाईक, सरफराज भाई, सरदार बिल्डर, पंकज कांबळे, शेख सदाम भाई, शेख पाशा आदींची उपस्थिती होती.

देगलूर नाका भागात रात्री उशीरापर्यंत हॉटेल, चहाटपरी व पानटपरी सुरू होत्या. राष्ट्रवादी युवकचे रऊफ जमिनदार यांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिल्यानंतर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या भागात पोलिसांचे पेट्रालिंग वाढवले. त्यामुळे दोन दिवसांपासून दहा वाजताच या भागातील हॉटेल बंद होत असल्याचे दिसत आहे.

# अभ्यासात सातत्य ठेवा, यश मिळेल –पोनि पवार

## विद्यार्थ्यांना मोफत पोलीस, सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)**– कोणत्याही स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळविणे शक्य आहे. पण त्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवावे, असे प्रतिपादन इतवारा शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जगन पवार यांनी केले.

समृद्ध जीवन प्रतिष्ठान नांदेड, बार्टी पुणे यांच्या मार्फत मोफत पोलीस सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण दिले जाते. या संदर्भाने मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार हिंगोले, चंद्रमनी धुतराज, डॉ. सिद्धोधन एडके, इंजि. प्रवीण खंदारे, अविनाश राठोड, अशोक कावडे, हर्षद कुरवारे यांची उपस्थिती होती.

पोलीस निरीक्षक जगन पवार म्हणाले की, कुठलेही यश सहजासहजी मिळत नसते. त्यामुळे कठोर परिश्रम करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे. नव-नवीन पुस्तके वाचायला हवीत. आमच्या काळात आताची पुस्तके आणि इतर साधने अभ्यासासाठी उपलब्ध नव्हती. त्यामुळे उपलब्ध साधनांचा उपयोग करून अभ्यासात सातत्य ठेवून यश संपादन केले पाहिजे. खडतर प्रवासाशिवाय यश मिळत नाही. त्यामुळे सातत्याने अभ्यास करून स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन करण्यासाठी पराकष्ठा करावी तर यश मिळेल, असे सांगून त्यांनी त्यांच्या यशामागील अनेक उदाहरणे विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमाला स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन चंद्रमनी धुतराज यांनी केले तर सूत्रसंचालन राजेंद्र हनवते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयसेन पंडित, करण पाटील, स्वप्नील तुळसे, पूनम गायकवाड, संदेश ढवळे, रोहित गायकवाड, गंगामैया येरणे, विमल पेंदोर, अजय खिल्लारे, नितीन कदम यांनी परिश्रम घेतले.

# विद्यापीठात विविध उपक्रम राबविण्यासाठी पाठपुरावा करू –आ. भीमराव केराम



**किनवट (प्रतिनिधी)**– आदिवासी भागातील विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेवून येथील संस्कृती संवर्धनासाठी विद्यापीठ विविध उपक्रम सुरू करीत आहे. शासन नक्कीच याला पाठबळ देईल, मी त्यासाठी पाठपुरावा करीन, अशी ग्वाही आ. भीमराव केराम यांनी दिली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवट येथे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समितीची बैठक दि.२१ रोजी संपन्न झाली. त्यावेळी आ. भीमराव केराम बोलत होते. अनेक विकासात्मक योजना सुरू करण्यासाठी विद्यापीठ अध्ययन अध्यापनासोबतच अनेक उपक्रम सुरू करीत आहे. त्याच्या नियोजनासाठी ही बैठक घेण्यात आली. कुलगुरु डॉ. चासकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. बैठकीस संशोधन केंद्राच्या सल्लागार समितीचे सदस्य डॉ. अशोक बेलखोडे, प्रफुल्ल राठोड, नारायणराव सिडाम, गंगारेड्डी बैनमवार, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. माधव पाटील, नवोपक्रम विभागाचे संचालक डॉ. शैलेश वढेर, विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता विभागाचे प्रमुख डॉ सुरेंद्र रेड्डी, प्राचार्य डॉ. शिवराज बेंबरेकर यावेळी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते गंगन्ना नेम्मानीवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, प्रा. द्वारकाप्रसाद वायाळ, नकुल राठोड यांनी विविध विषयांवर कुलगुरूंशी चर्चा केली. केंद्राचे प्रभारी समन्वयक प्रो .डॉ मार्तंड कुलकर्णी यांनी

प्रस्ताविकात केंद्रात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सहसमन्वयक डॉ. सुनील व्यवहारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ शिवाजी गायकवाड यांनी आभार मानले.

# घरफोडी करणारा अट्टल चोरटा जेरबंद; दागिने जप्त, तीन घरफोडीचे गुन्हे उघड

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोड्या करून फरार असलेल्या आरोपीला नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ५६ हजार ४०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले असून हद्दीतील तीन घरफोडीचे गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडा, यासारखे मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते.





त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथील गुन्हे शोध पथकातील पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड व त्यांची टिम दिनांक २७ जून रोजी चोरी, घरफोडी गुन्ह्यातील पाहीजे व फरारी आरोपी शोध व गुन्हेगार वॉच पेट्रोलींग कामी खासगी वाहनाने करीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त माहीती मिळाली की, चोरी, घरफोडी करणारा एक आरोपी धनेगाव बायपास ब्रिजखाली संशयीतरित्या थांबलेला आहे. सदरची माहीती पो.नि. ओमकांत चिंचोलकर यांना देवुन मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी तात्काळ जावुन तेथे थांबलेल्या एका संशयीत इसमास ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता अब्दुल अफताब अब्दुल अजीज (वय २२, व्यवसाय बेकार रा. अस्तान मस्जिदजवळ गाडेगाव रोड ता, नांदेड) असे त्याने नाव सांगितले.

या चौकशीत नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली.

आरोपी अब्दुल अफताब अब्दुल अजीज व त्याचा साथीदार मोहमद आमेर उर्फ पप्पु रा. मुखीद फंक्शन हॉल जवळ खुदबेनगर यांनी पंकज नगर धनेगाव राहुल पुंडलिक गोणे, हडको येथील सचिन अवधूत लांडगे आणि मिल्लतनगर भागातील ऐतेशाम्अली नवाब या तीन ठिकाणी घरफोडी केल्याचे कबुल केले. या गुन्ह्यातील नगदी रुपये व सोन्याचे व चांदीचे दागिने असा एकुण ५६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईबद्दल गुन्हे शोध पथकातील पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड व त्यांची टीमचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी कौतुक केले आहे.


# प्रगतीमंत्र

# करूया ऑफिसच्या कामांचे उत्तम नियोजन



**हल्ली प्रत्येकाला आपल्या कामाची चिंता सतावत असते. आजचा दिवस संपला तरी उद्याचे काय हा प्रश्न असतोच. नोकरीवर आपला चरितार्थ असल्याने प्रत्येकजण तिथे चिकाटीने काम करत असतो. पण बरेचदा काम अधिक असेल तर त्याचा ताण जाणवू लागतो. कधीकधी कार्यालयीन वेळ उलटून गेली तरी काम आटोपत नाही, अधिकाचा वेळ काढून काम पूर्ण करावे लागते. पण या गोष्टी टाळताही येऊ शकतात. काम सोपे करण्यासाठी आवश्यक असते ते कामाचे नियोजन. खूप काम एकत्र आले की त्याचे नियोजन करणे राहून जाते. पण नियोजनपूर्वक आणि शिस्तबद्ध पद्धतीने कामा केले तर ते सहज आणि वेळेत पूर्ण होऊ शकते. त्यासाठी काही खास गोष्टी आपल्याला आंगीकाराव्या लागतील. त्यासाठीच ऑफिसच्या कामाचे नियोजन कसे करावे हे जाणून घेऊया...**

- कामाची आखणी करा : ऑफिसमध्ये तुमचे कामाचे स्वरूप ठरलेले असेल त्यानुसार तुम्हाला काही टार्गेट देखील असतील तर त्याची आधी आखणी करा. आपल्यापुढे किती काम आहे आणि ते कसे पूर्ण करायचे याचा एक कृती आराखडा तयार करा. विशिष्ट पद्धतीने ठरवून काम केले तर टार्गेट पूर्ण करता येते.
- कामाचा क्रम ठरवा : खूप कामे अंगावर असतील तर आधी त्याचा क्रम ठरवता याला हवा. आपल्या वरिष्ठांशी चर्चा करून कोणत्या कामाला किती महत्व द्यायचे आणि कोणते काम आधी पूर्ण करायचे हे निश्चित करा. कामाचा क्रम ठरवला तर कामे हातवेगळी करणे सोपे होते आणि कामाला अधिक गती येते.
- वेळेचे नियोजन : आपल्या हातात किती वेळ आहे आणि काम किती आहे कळल्यानंतर वेळा ठरवून घ्या. एखादे विशिष्ट काम एखाद्या वेळेतच पूर्ण करण्याचे टार्गेट ठेवा. तसेच कुठे वेळ वाचवता येईल याचा विचार करून त्यानुसार कामे करा. वेळेचे गणित साधले तर कोणतेही काम पूर्ण करता येते.
- फोनवर बोलणे टाळा : अनेकदा कामात असतानाही कामाव्यतिरिक्त अनेक फोन कॉल आणि मेसेज आपल्याला येत असतात. अशावेळी त्यांना महत्व न देता कामासाठी वेळ द्यायला हवा. आपण बाहेरच्या कॉल आणि मेसेजला प्राधान्य दिले तर त्यात आपला बराच वेळ निघून जातो आणि कामे अर्धवट राहतात.
- कामाचा अतिरिक्त भार आल्यास : कामाचा अचानक अतिरिक्त भार आल्यास त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करा. ते काम किती आहे, किती वेळात पूर्ण करता येईल याचा अंदाज घ्या. काम तुमच्याकडून शक्य होणार नसेल तर सहकाऱ्यांची मदत घ्या. त्या संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करून त्याचे नियोजन करा.त्या कामाची तातडी लक्षात घेऊन त्याचा प्राधान्यक्रम ठरवायला हवा.
- नोंदवही करा : आपल्या कामाची नोंदवही आपल्याकडे हवी. आज कोणते काम करायचे आहे, ते किती वेळात करायचे आहे. त्यासाठीच्या सूचना काय आहेत, ऐनवेळी काही बदल झाले आहे का आणि अन्य अनेक लहानमोठ्या नोंदी या वहीमध्ये किंवा डायरीमध्ये करून ठेवा. अशा नोंदी ठेवल्यास आपल्याला कामाचे, वेळेचे स्मरण राहते. घाई गडबडीत काही विसरलोच तर त्याची आठवण करून देण्यासाठी अशी नोंदवही उपयोगी ठरते.



# अभ्यासक्रम इंटिरियर डिझायनिंगचा

**घर, कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, रुग्णालये, हॉटेल्स, बस स्थानके इत्यादी सार्वजनिक ठिकाणांचे डिझाइन बदलण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. त्यामुळे इंटिरियर डिझायनर्सना वेगळ्या संधी मिळू शकतात...**

इंटिरियर डिझायनिंगमधील बदल हळूहळू घडू लागले आहेत. त्या अनुषंगाने अनेकांनी विचार सुरू केलेलाच आहे. त्यामुळे इंटिरियर डिझायनर्सना अनेक संधी आहेत. आपण इंटिरियर डिझायनिंग अभ्यासक्रमाचा विचार करू. कोणत्याही ज्ञानशाखेतील फक्त ५० टक्क्यांच्या आसपास गुण मिळालेल्या विद्यार्थ्यास हा अभ्यासक्रम करता येणे शक्य आहे. तुमच्यामध्ये जरा हटके करण्याचा किडा सारखा वळवळत असल्यास हे क्षेत्र अमर्याद संधी मिळवून देऊ शकते.

## परिश्रम अन् संयम

इंटिरियर डिझायनिंगचा अभ्यासक्रम केल्याबरोबर लगेच दुसऱ्या क्षणाला चांगली नोकरी मिळेल वा मोठी कामे मिळतील, असे शक्य होत नाही. कारण या क्षेत्रात बाप दाखव - श्राद्ध कर - दक्षिणा घे, हा सिद्धांत महत्त्वाचा ठरतो. इंटिरियर डिझायनिंग ही कलाकारी आहे. कोणत्याही कलाकारास पहिल्याच झटक्यात अपवादानेच संधी मिळते. त्याला आपली कला सिद्ध करण्यासाठी संयमाने प्रयत्न करावे लागतात. हे प्रयत्न कधीच वाया जात नाहीत. तुमची फुललेली प्रतिभा एखाद्याच्या लक्षात आली, तर तोच तुमचा वाटाड्या ठरतो आणि नव्या नव्या ग्राहकांना तुमच्याकडे आणि तुम्हाला या ग्राहकांकडे पोचवतो. पदवीस्तरीय कालावधीतील सैद्धांतिक पाया आणि त्यानंतरचा अनुभवाचा पाया खणखणीत असेल, तर मग तुमची गाडी सुसाट पळू शकते.

## किमान पात्रता

इंटीरिअर डेकोरेटींगचा चार वर्षांचा पूर्ण वेळ कोर्स असतो. हा कोर्स अंडरग्रॅज्युएट कोर्स आहे. यासाठी १२ वीत किमान ५० टक्के गुण असणं अपेक्षित असतं. या कोसेर्समध्ये डिप्लोमा



कोर्सही उपलब्ध आहे. गव्हर्नमेंट आणि प्रायव्हेट कॉलेजेसमध्ये इंटीरिअर डेकोरेटींगचे डिग्री-डिप्लोमा कोसेर्स आहेत. इंटीरिअर डिझायनिंगमध्ये ग्रॅज्युएट झाल्यानंतर मास्टर कोर्सही करू शकता.

## करिअर ऑप्शन्स

अत्याधुनिक कार्यालयांसाठी जागेची गरज, उपलब्ध जागेचा योग्य वापर आणि प्रसन्न वातावरण असणं आवश्यक भासू लागलं आहे. त्यासाठी इंटीरिअर डिझायनर आवश्यक झाला आहे. त्यामुळेच बांधकाम क्षेत्रात इंटिरिअर डिझायनर्सची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. रिअल इस्टेट, आर्किटेक्चर फर्म्स आदी ठिकाणी नोकरीची संधी मिळू शकते. स्वतःची प्रायव्हेट फर्म काढू शकतो.

## ही कौशल्यं हवीत


इंटीरिअर डिझायनिंग करू इच्छिणाऱ्यांची संवादक्षमता उत्तम असावी लागते. इंग्रजीवर प्रभुत्व असावं लागतं. आपल्या क्लायंटसना एखादं डिझाइन पटवून देण्यासाठीचा आत्मविश्वास आणि संभाषण कौशल्य असावं लागतं. त्यासाठी उत्तम श्रोता असणंही तितकच महत्त्वाचं असतं. तुमच्या क्लायंटच्या आवडीनिवडी ऐकून घेणं, हे खूप महत्त्वाचं असतं. समोरच्यावर प्रभाव टाकण्याची क्षमता तुमच्याकडे असेल तर तुमच्या कल्पना, योजना समोरच्याला पटवून देऊ शकाल.




घर असावे छान असे सध्याचे ब्रीदवाक्य नसून घर दिसावे स्मार्ट, असे आहे. घराला स्मार्टपणा आणण्याची जादू इंटिरियर डिझायनरला प्राप्त झालेली असते. इंटिरियर डिझायनिंगच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना, या जादूमध्ये तज्ज्ञता प्राप्त व्हावी म्हणून, स्केचिंग, ड्रॉइंग, डिझायनिंगची मूलभूत तत्त्वे, डिझायनिंगच्या दृष्टीने आवश्यक असणारी भूमितीय कौशल्ये आणि तंत्र, अभियांत्रिकी चित्रकला, ग्राफिक्स, डिझायनिंगची विविध साधने, दृश्यात्मक आरेखन, छायाचित्रण कला, संगणकाची मूलभूत तत्त्वे, संकल्पनेचे डिझाइन आणि चित्रांकन, अंतर्गत सजावटीचा इतिहास, सौंदर्यकला, आकृती आणि आकार, रंगसंगती, त्यासाठी वापरली जाणारी साधने व साहित्य, डिझायनिंगची कार्यपद्धती, अंतर्गत सजावटीची प्रक्रिया, डिझायनिंगची प्रतिकृती, कलाकुसरीवर आधारित डिझायनिंग, सार्वजनिक ठिकाणचे डिझायनिंग, वाणिज्यक कार्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जागांचे इंटिरियर डिझायनिंग, मोठ्या इमारती अथवा मॉलची दृश्यात्मकता वाढवण्याचा अभ्यास, डिझायनिंग व्यवस्थापन, डिजिटल मॉडेलची निर्मिती आणि त्याची प्रत्यक्ष प्रतिकृती, सांस्कृतिक अभ्यास, अंतर्गत सजावटीसाठी आवश्यक असणाऱ्या छायात्रिणाचे तंत्र, निवासी संकुलांचे डिझायनिंग, नवकल्पनेचे सर्जन, अंतर्गत विद्युत प्रकाश, वास्तुकलेची मूलभूत तत्त्वे, वस्तुसंग्रहालये आणि चित्रगॅलरींच्या डिझाइन संकल्पना, प्रदर्शनाचे डिझाइन, ग्राहकाच्या संकल्पनेनुसार डिझायनिंगचे तंत्र, वैश्विक डिझायनिंग आणि शाश्वतता इत्यादी बाबींचा समावेश असतो. अशी या अभ्यासक्रमाची ढोबळमानाने रूपरेषा आहे. इंटिरियर डिझायनिंगच्या अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिकांचा समावेश असतो. शिवाय इंटिरियर डिझायनिंगच्या वेगवेगळ्या कंपन्या, फर्म्स, बिल्डर यांच्याकडे इंटर्नशिप करण्याचीही संधी मिळते. या कालावधीत आपण शिकलेल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा वापर प्रभावीपणे करता आला, तर आपल्या करिअरचा पुढचा मार्ग सुलभ होऊ शकतो.


## अनुभवाचा फायदा...

चांगल्या अनुभव प्राप्त इंटिरियर डिझायनर्सना मोठी मागणी असते. असे डिझायनर्स अनेकदा घराच्या एकूण किमतीच्या काही टक्केवारीमध्ये शुल्क आकारतात. असे डिझायनर्स हे अत्यंत उच्च दर्जाची सेवा देतात. सर्व आधुनिक तंत्रांचा आणि प्रवाहांचा कौशल्यपूर्ण वापर करतात. ग्राहकांचे पूर्ण समाधान होईपर्यंत काम करतात. ग्राहकांच्या संकल्पनेनुसार आणि त्यांच्याकडील निधीनुसार जे डिझायनर्स उत्तम काम करतात, त्यांना पुढील संधी गतीने मिळू लागते. मुंबई-पुणे-ठाणे-नाशिक-नागपूर या अ श्रेणींच्या शहरांसह ब आणि क श्रेणीच्या शहरांमध्येही मोठमोठी गृहसंकुले उभी राहत आहेत. वाणिज्यक कार्यासाठी लागणाऱ्या इमारती उभ्या राहत आहेत. रुग्णालये - रिसॉर्ट्स - हॉटेल्स - पंचतारांकित निवासस्थाने - सेवा उद्योग देणारी कार्यालये उभी राहत आहे. अशा सर्वांचाच कल हा इंटिरियर डिझायनिंगकडे असतो. आपल्या एकूण खर्चाचा काही भाग यासाठी बाजूला काढलेला असतो. त्यामुळेच इंटिरियर डिझायनर्सचे मार्केट वाढत चालले आहे. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी इंटिरियर डिझायनर होण्यासाठी या विषयाचा अभ्यासक्रम चांगल्या संस्थांमधून करायला हवा. या क्षेत्राकडे वळणाऱ्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्याने चांगल्या संस्था या चाळणी परीक्षा घेऊन प्रवेश देतात. या परीक्षा सर्वसाधारण स्वरूपाच्या असतात. विद्यार्थ्यांचा इंटिरियर



डिझायनिंगचा कल बघण्यासाठी प्रश्न विचारले जातात. चित्रकला-रेखांकन या विषयीच्या मूलभूत माहितीची संबंधित विद्यार्थ्याची झेप कुठपर्यंत जाते हे तपासले जाते. शिवाय समकालीन घडामोडीवर काही प्रश्न विचारले जाऊ शकतात. परीक्षेचा दर्जा हा बारावीचा असतो. बहुतेक सर्व परीक्षा या ऑब्जेक्टिव्ह पद्धतीच्या म्हणजेच वस्तुनिष्ठ पद्धतीच्या असतात...

# अंगी हवी कुशलता...



**आजच्या शिकलेल्या पिढीला सतावणारा सगळ्यात मोठा प्रश्न म्हणजे नोकरी. आजकाल आपण अनेक शिकलेल्या मुला, मुलींना नोकरीच्या शोधात वणवण फिरताना पाहतो. ऑनलाइन बरेच ग्रुप आहेत की जिथे नोकरीच्या संधींची माहिती दिली जाते अशा ग्रुपमध्ये नोकरी शोधणारे पण खूप जण आहेत. या लोकांमध्ये इंजिनिअरिंग आणि MBA झालेल्या लोकांची संख्या जास्त दिसून येते. पण एवढं उच्च शिक्षण घेऊन सुद्धा खरंच नोकरी नाही का? की चित्र काही वेगळंच आहे? असा प्रश्न नक्कीच पडतो.**

वास्तविक नोकरी करणाऱ्या लोकांची कंपन्यांना खूप गरज आहे. पण दिवसेंदिवस चांगल्या डिग्री असणारे परंतु एम्प्लॉएबल स्किल्स नसणाऱ्यांचीच संख्या वाढत चालली आहे. या गर्दीत चांगल्या स्किल्स असणाऱ्या एम्प्लॉयीजची कमतरता अनेक कंपन्यांना भासत आहे. आता हे एम्प्लॉएबल स्किल म्हणजे काय तर नोकरी करण्यासाठी लागणारी तांत्रिक माहिती, काम करण्याची पद्धत, नवीन शिकण्याची आवड, तसेच टिममधे काम करण्याची क्षमता. आजच्या बदलत्या जागतिक अर्थ कारणामुळे आणि वाढलेल्या स्पर्धेमुळे, कंपन्यांचे प्रॉफिटचे मार्जिन आधीपेक्षा कमी झाले आहे. त्यामुळे त्यांना आधीसारखे फ्रेशर्स मुला, मुलींना ट्रेनिंग देऊन, मग नोकरीमध्ये समाविष्ट करून घेणे सोपे व व्यावहारिक राहिले नाही. नवीन मुलांना ट्रेनिंग देण्यापेक्षा कंपन्यांना आज ज्या लोकांना कामाचा अनुभव आहे, अशा लोकांना थोडा जास्त पगार देऊन नोकरीवर ठेवण्यास सोपे वाटत आहे. याचे कारण की ज्यावेळी नवीन मुले जॉईन होतात, तेव्हा पहिले ६ महिने किंवा १ वर्ष हा त्यांचा ट्रेनिंग कालावधी असतो. या कालावधीमध्ये कंपनीला त्यांच्यावर खर्च करावा लागतो, बऱ्याच गोष्टींची माहिती द्यावी लागते. या खर्चाचा जो बोजा आहे तो वाढत्या स्पर्धेमुळे कंपनी आज उचलू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, एकदा का या फ्रेशर्सचा ट्रेनिंग कालावधी पूर्ण झाला की त्यांना लगेच दुसऱ्या कंपनीच्या ऑफर येऊ लागतात. अशा वेळेस अधिक पैसे भेटतील या आशेने, फ्रेशर्स नवीन कंपनीकडे धाव घेतात. त्यामुळे जेव्हा या ट्रेनिंग दिलेल्या लोकांकडून काम करून घ्याची वेळ येते तेव्हा, ही मुलं लगेच पहिली कंपनी सोडून जास्त पगाराच्या आमिषाने दुसरी कंपनी जॉईन करून टाकतात. कंपनीचा या मुलांच्या ट्रेनिंगवरच खर्च होतो, प्रत्यक्षात त्यांच्याकडून प्रॉडक्टिव्हिटी अशी काहीच मिळत नाही. शेवटी हे सगळं नुकसानीचंच गणित होतं. या दोन्ही कारणांमुळे, कंपन्या आता फ्रेशर्स घेऊन त्यांना ट्रेनिंग देण्यापेक्षा सरळ पगार वाढवून अनुभवी लोकांना घेतात. हे अनुभवी लोक पहिल्या दिवसापासून कंपनी ला १००% प्रॉडक्टिव्हिटी देतात आणि कंपनीला त्यांचा पगार देणेही सोयीस्कर वाटते.

## एम्प्लॉएबल स्किलचा अभाव

आजच्या मुलांकडे शिक्षण तर आहे, पण नोकरीसाठी हे जे एम्प्लॉएबल स्किल लागतात त्यांची मात्र खूपच कमतरता आहे. याचं मुख्य कारण म्हणजे काळानुसार आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये जो बदल घडायला हवा होता, तसा तो फारसा घडलेला नाहीये. तसेच नवीन शैक्षणिक संस्था आणि शैक्षणिक संकुल तयार झाल्यामुळे शिक्षण तर सुलभ झाले, पण या नवीन संस्थांनी शिक्षणाच्या व्यवसायीकरणावर भर दिला आणि आपोआप शिक्षणाचा दर्जा घसरला. त्यामुळे आज डिग्री घेणे आधीपेक्षा खूप सोपे झाले आहे, पण एम्प्लॉएबल स्किलचा मात्र अभाव आहे. प्रत्यक्षात जर पाहिलं तर यामध्ये मुलांचा काही दोष नाही. कारण त्यांचा बाहेरच्या जगाशी एवढा संपर्क नसतोच. शाळा आणि कॉलेजमध्ये मिळणाऱ्या मार्गदर्शनाप्रमाणे ते आपली वाटचाल करत असतात. मार्गदर्शनाचा अभाव हा सुद्धा फ्रेशर्सला नोकरी न मिळण्यामागे एक कारण आहे.

## बारकावे तपासा...

इंडस्ट्रीमध्ये आज कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या आहेत हे आधी समजून घेणे गरजेचे आहे. याचं कारण म्हणजे, यांत्रिकीकरणामुळे कंपन्यांमधे कामाचे स्वरूप खूपच बदलले आहे. जुन्या काळात जी नोकरीची पदं होती, ती आज राहिली नाहीत. याउलट अनेक नवीन पदं आली आहेत. जी प्रोफाईल आधी एखादा इलेक्ट्रिकल इंजिनीयर करू शकत होता, ती आज इंडस्ट्रीत राहिली सुद्धा नसेल. याच कारणांमुळे इंडस्ट्रीमध्ये आपल्या शिक्षणाला कोणती प्रोफाईल दिली जाते हे माहिती असणे खूप गरजेचे आहे. या वेगवेगळ्या प्रोफाईल्समधून आपल्याला कोणत्या प्रोफाईलमध्ये आवड आहे ते ठरवू शकता. मग प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा यासाठी तुम्ही कंपनीमध्ये इंटर्नशिप किंवा ट्रेनिंग प्रोजेक्ट्स करू शकता. अशाने तुम्हाला कंपनी चालते कशी, कंपनीत कोणती कामे होतात, त्यातले बारकावे काय असतात याची माहिती मिळेल. हीच माहिती पुढे तुम्हाला इंटरव्ह्यूमध्ये उपयोगी पडेल. आपण जर काळाच्या गरजेनुसार आपली शैक्षणिक माहिती आणि नोकरीच्या स्किल्स आत्मसात केल्या तर आपल्यासाठी आजसुद्धा भरपूर नोकऱ्या उपलब्ध आहेत हेच दिसून येईल.



## विद्यार्थ्याने काय करावे?

डळमळत्या शैक्षणिक परिस्थितीत, नोकरीच्या बदलत्या समीकरणांमध्ये एका विद्यार्थ्याने नक्की काय केले पाहिजे? ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाले आहे त्यांनी सर्वप्रथम आपल्याला नोकरीसाठी कोणत्या स्किल्स कमी पडत आहेत त्याचा आढावा घ्यावा. या उणिवा भरून काढण्यासाठी एखादा इंडस्ट्रीसाठी परिपूर्ण असा कोर्स करावा. आपल्या सॉफ्ट स्किल्स आणि प्रेझेंटेशन स्किल्सवर लक्ष देऊन त्यामध्ये प्राविण्य मिळवावे. यातून आपल्याला नोकरीची कवाडं नक्कीच खुले होतील. जे विद्यार्थी अजून शिक्षण घेत आहेत, त्यांनी अवांतर वाचन करणे, इंटरनेटचा प्रभावी वापर करून अधिक माहिती मिळवणे, नवीन स्किल आत्मसात करणे, ज्या गोष्टी येत आहेत त्यात प्राविण्य मिळवणे, छंद जोपासणे अशा एक ना अनेक गोष्टी कराव्यात. तसेच नोकरी संदर्भात बरीच माहिती असणे अवश्यक आहे. जसे की, आपल्या क्षेत्रात नोकरीच्या काय संधी आहेत, पगार किती आहे, कोणकोणत्या कंपनी नोकरी देऊ शकतात, कोणत्या पदांसाठी फ्रेशर्सला घेतात, त्या कंपनीमध्ये ट्रेनिंग करण्याच्या काही संधी आहेत का, कोणत्या शहरात नोकऱ्या जास्त आहेत, नोकरीसाठी कोणते स्किल्स लागतात हे सर्व केल्यावर तुम्ही काही नोकऱ्यांसाठी पात्र होऊ शकता आणि इंटरव्ह्यूमध्येही उत्तीर्ण होऊ शकता.

## जाहीर प्रगटन
### भगवान आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/ मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणू निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी दिनांक १/७/२०२५ ते ७/७/२०२५ असा आहे.तसेच प्राप्त उमेदवार अर्जाची छाननी दिनांक ८/७/२०२५ वैध नामनिर्देशन प्रत्राची दिनांक ९/७/२०२५ उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक २३/७/२०२५ व मतदान दिनांक २/८/२०२५ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्त निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबधंक सहकारी संस्था ता.नांदेड यांच्या कार्यलयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

**(बी.बी. बोधगिरे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**भगवान आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड मो.७०२०४६८६५२**

## जाहीर प्रगटन
### परिसर अभियांत्रिकी कर्मचारी सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/ मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणू निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी दिनांक १/७/२०२५ ते ७/७/२०२५ असा आहे.तसेच प्राप्त उमेदवार अर्जाची छाननी दिनांक ८/७/२०२५ वैध नामनिर्देशन प्रत्राची दिनांक ९/७/२०२५ उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक २३/७/२०२५ व मतदान दिनांक २/८/२०२५ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्त निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबधंक सहकारी संस्था ता.नांदेड यांच्या कार्यलयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

**(जी.यु. कुटे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**परिसर अभियांत्रिकी कर्मचारी सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड मो.७७५७८९५००७**

## जाहीर प्रगटन
### घरोंदा प्राथमिक सहकारी ग्राहक भांडार म.नांदेड ता.जि.नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/ मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणू निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी दिनांक १/७/२०२५ ते ७/७/२०२५ असा आहे.तसेच प्राप्त उमेदवार अर्जाची छाननी दिनांक ८/७/२०२५ वैध नामनिर्देशन प्रत्राची दिनांक ९/७/२०२५ उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक २३/७/२०२५ व मतदान दिनांक २/८/२०२५ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्त निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबधंक सहकारी संस्था ता.नांदेड यांच्या कार्यलयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

**(जी.यु. कुटे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**घरोंदा प्राथमिक सहकारी ग्राहक भांडार म.नांदेड ता.जि.नांदेड मो.मो.७७५७८९५००७**

## जाहीर प्रगटन
### श्री रेणूका जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/ मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम दिनांक ३०/६/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून उमेदवारी दाखल करण्याचा कालावधी दिनांक १/७/२०२५ ते ७/७/२०२५ असा आहे.तसेच प्राप्त उमेदवार अर्जाची छाननी दिनांक ८/७/२०२५ वैध नामनिर्देशन प्रत्राची दिनांक ९/७/२०२५ उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक २३/७/२०२५ व मतदान दिनांक ३/८/२०२५ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्त निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबधंक सहकारी संस्था ता.नांदेड यांच्या कार्यलयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

**(एस.एस.जळके)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**श्री रेणूका जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन
### कपिला पशुसंवर्धन खाते कर्मचारी सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/ मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम दिनांक ३०/६/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून उमेदवारी दाखल करण्याचा कालावधी दिनांक १/७/२०२५ ते ७/७/२०२५ असा आहे.तसेच प्राप्त उमेदवार अर्जाची छाननी दिनांक ८/७/२०२५ वैध नामनिर्देशन प्रत्राची दिनांक ९/७/२०२५ उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक २३/७/२०२५ व मतदान दिनांक २/८/२०२५ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्त निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबधंक सहकारी संस्था ता.नांदेड यांच्या कार्यलयीन नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

**(अभिजीत दिक्षीत)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**कपिला पशुसंवर्धन खाते कर्मचारी सहकारी पतसंस्था म.नांदेड ता.जि.नांदेड**

## प्रवेश देणे चालू आहे.
### श्री संत गुरू विठ्ठलनाथ शिक्षण प्रसारक मंडळ सिडको संचलीत साईबाबा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह वाघाळा सिडको नांदेड

सदरील शासन मान्य अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षे सन २०२५-२६ वर्षासाठी इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकत असलेल्या व स्थानिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या गरूज व होतकरू विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार वसतिगृहात प्रवेश देणे चालू आहे. सदरील वसतीगृह सिडको येथे रूबी हॉटेलच्या समोरील बाजू आहे

| अ.क्र | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती | १४ टक्के |
| ३ | विजाभज/व्हिजेएनटी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागास प्रवर्ग | २ टक्के |
| | एकूण | १०० |
| ५ | इतर मागास प्रवर्ग/ओबीसी | १५ टक्के |
| ६ | बिगर मागास प्रवर्ग/ओपन | ५ टक्के |

वैशिष्टये-भव्य व सुसज्य इमारत, पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे वैयक्तीक लक्ष, वसतीगृहात ग्रंथालय, विनामुल्य भोजनाची व्यवस्था,

**अध्यक्ष** मो.९८६०७३५८१२ **अधिक्षक** ९८६०६६९७४७

## श्री. छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संस्था संचलित,
## श्री. शंकरराव चव्हाण ग्रामीण अध्यापक विद्यालय लोंढेसांगवी ता. लोहा जि.नांदेड
(महाराष्ट्र शासन व एन.सी.टी.ई भोपाळ मान्यता प्राप्त कोड)

## डी.एल.एड. प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटा प्रवेश सूचना. २०२५-२६

डी.एल.एड.प्रथम वर्ष २०२५.२६ या शैक्षणिक वर्षासाठी खाजगी विनाअनुदानित अध्यापक विद्यालय प्रथम वर्ष डी.एल.एड. (मराठी माध्यम) प्रवेशासाठी एकुण क्षमतेच्या २० टक्के जागेसाठी खाजगी व्यवस्थापन कोटयातील पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी पात्र पात्र उमेदवाराने खालील दर्शवलेल्या कालावधीत आवेदन पत्र सादर करावेत.

**अर्ज विक्री** -दिनांक २६/५/२०२५ ते १०/६/२०२५
वेळ सकाळी ११.०० ते ५.००
**अर्ज स्विकृती** -दिनांक २१/५/२०२५ ते ११/६/२०२५
वेळ सकाळी ११.०० ते ५.००

ठिकाण -श्री शंकरराव चव्हाण ग्रामिण अध्यापक विद्यालय लोंढे सांगवी ता.लोहा जि.नांदेड

**प्रवेश अर्ज शुल्क**-- ओपन २००/-
मागासवर्गीयासाठी रू.१०० (जातीचे प्रमाणत्र सोब आणावे)

**शैक्षणिक पात्रता**- उमेदवार १२ वी कला, वाणिज्य विज्ञान, एम.सी.व्ही.सी अथवा य.च.म.मु.वि प्रथम वर्षे उत्तीर्ण ओपन ५० टक्के व मागासवर्गीय ४५ टक्के गुणासह उत्तर्णी असणे आवश्यक आहे.

**प्रवेश क्षमता**-५० जागा (व्यवस्थापन कोटा १० जागा) व्यवस्थापन कोट्यातील (२० टक्के) शाखा निहाय व संवर्ग निहाय आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| शाखा | विज्ञान (५० टक्के) | कला (४० टक्के) | वाणिज्य (१० टक्के) | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ०५ | ०४ | १ | १० |

**संवर्गनिहाय आरक्षण**

| संवर्ग | एस.सी.एस.टी (२० टक्के) | व्ही.जे.एन टी.ए.बी.सी.डी (११ टक्के) | एस.बी. सी.ओबीसी. (१९ टक्के) | ओपन (५० टक्के) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी माध्यम | २ | १ | २ | ५ | |

**प्राचार्य**
**श्री. शंकरराव चव्हाण ग्रामीण डी.एड. कॉलेज**
**लोंढेसांगवी ता. लोहा जि.नांदेड मो.९८२२००९६५८, ९४२३२३११९५**

Shri Chatrapati Shivaji Maharaj Shikshan Sanstha's
## Shri Shankarrao Chavan Rural D. Ed College
Londhe Sangvi, Post Joshi Sangvi Osmannagar, Tq. Loha Dist. Nanded-431708
NCTE Code APW 04301/122963

**Wanted**

| Sr.No. | Disg. | No of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | M.A. , M.Ed/M.A. Edu. With 50% Marks Teaching Experience 5 Year in D.Ed College. |
| 2 | Lecturer in Perspectives in Education. | 1 | M.A. , M.Ed/M.A. Edu. With 50% Marks |
| 3 | Lecturer in Science | 1 | M.Sc. M.Ed/ With 50% Marks |
| 4 | Lecturer in Math's. | 1 | M.Sc./M.Ed./With 50% Marks |
| 5 | Lecturer in Social Science & Humanities | 1 | M.A./M.Ed./M.A. Edu. With 50% Marks |
| 6 | Lecturer in Language. | 2 | M.A./M.Ed./M.A. Edu. With 50% Marks |
| 7 | Lecturer in Fine Art And Performing Art. | 1 | M.A. Music/Dance M.D. M.A. Edu. With 50% Marks |
| 8 | Lecturer in Phy Education | 1 | M.A. M.P.ed. With 50% Marks |
| 9 | Office Superintendent | 1 | Any Gradate With MSCIT |
| 10 | Store Keeper | 1 | Any Gradate. |
| 11 | Computer Lab Assistant | 1 | B.E.A. or B.E/B.Tech |
| 12 | Librarian | 1 | M.A. M.Lib |
| 13 | Peon | 1 | SSC Pass |

- Attend Interview With Original Document Adhar Card, Pan and Photo
- Reservation As Per Govt Of Maharashtra, Policy
- Pay Scale as Per Govt of Maharashtra, Rules
- No TA/DA Will Be Paid For Attend Interview
- Interview As on 13/3/2025 At. 11.00 am as College Campus, Londhe Sangvi

Principal
Shri Shankarrao Chavan Rural
D.ed Londhesangvi
Tq. Loha Dist. Nanded

Secretary
Shri Chatrpati Shivaji Maharaj
Shikshan Sanstha, Londhe Sangvi
Tq. Loha Dist. Nanded

## निवडणूक कार्यक्रम
### नांदेड जिल्हा वैद्यकिय अधिकारी वर्ग सहकारी पतसंस्था म.नांदेड
### संचालक मंडळ निवडणुक (सन 2025-2030)

**वाचा** :1 मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-6/नांदेड/कवर्ग/ निनिअनियुक्ती/ 3252/सन 2025, दिनांक: 23/06/2025.
2. मा.तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे निवडणूक कार्यक्रम मंजूरी आदेश जा.क्र.899/25 दि. 27/06/2025.

**पोटनियम व कायद्याप्रमाणे एकूण निवडावयाच्या जागा :** (13)

1) सर्वसाधारण - (08)
2) अ.जा./अ.ज. - (01)
3) महिला राखीव - (02)
4) इतर मागास प्रवर्ग - (01)
5) विजा/भज/विमाप्र - (01)

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | 30/06/2025 | स. 11.00 वाजता | संस्थेचे कार्यालय व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय |
| 2 | नामनिर्देशन दाखल करण्यासाठी अखेरचा दिनांक | 01/07/2025 ते 07/07/2025 | स.11.00 ते दु.3.00 पर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 3 | नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करणे | 07/07/2025 | सायं. 04.00 वा. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 4 | छाननीचा दिनांक | 08/07/2025 | सकाळी 11.30 ते छाननी संपेपर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 5 | वैध नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | 09/07/2025 | दुपारी 01.00 वाजता | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 6 | ज्या दिनांकापर्यंत उमदेवारी मागे घेता येईल असा दिनांक | 09/07/2025 ते 23/07/2025 | स.11.00 ते दु.3.00 वा. पर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 7 | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक आणि चिन्हांचे वाटप | 24/07/2025 | स.11.30 वा. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 8 | मतदान ज्या दिनांक, वेळेस, कालावधीत घेण्यात येईल तो दिनांक, वेळ कालावधी आणि ठिकाण | 03/08/2025 | स.8.00 ते दु.4.00 वा.पर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 9 | मतमोजणी दिनांक, वेळ आणि ठिकाण | 03/08/2025 | मतदान संपल्यानंतर लगेचच | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 10 | निकाल जाहीर करण्याचा दिनांक | 03/08/2025 | मतमोजणी नंतर लगेचच | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |

**टीप: 1. वरीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम छाननीच्या टप्प्यानंतर मतदान व मतमोजणीचा दिवस वगळून शासकीय / सार्वजनिक सुटयांखेरीज सुरु राहील.**
**2. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड**

स्थळ : **नांदेड**
दिनांक : 30/06/2025.

स्वाक्षरीत/-
**(एस. बी. मंगनाळे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**नांदेड जिल्हा वैद्यकिय अधिकारी वर्ग सहकारी पतसंस्था म.नांदेड**

## निवडणूक कार्यक्रम
### जिल्हा कोषागार कर्मचारी सहकारी पतसंस्था म.जि.नांदेड
### संचालक मंडळ निवडणुक (सन 2025-2030)

**वाचा** :1 मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-6/नांदेड/कवर्ग/ निनिअनियुक्ती/ 3252/सन 2025, दिनांक: 23/06/2025.
2. मा.तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे निवडणूक कार्यक्रम मंजूरी आदेश जा.क्र.898/25, दि. 27/06/2025.

**पोटनियम व कायद्याप्रमाणे एकूण निवडावयाच्या जागा :** (11)

1) सर्वसाधारण - (06)
2) अ.जा./अ.ज. - (01)
3) महिला राखीव - (02)
4) इतर मागास प्रवर्ग - (01)
5) विजा/भज/विमाप्र - (01)

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | 30/06/2025 | स. 11.00 वाजता | संस्थेचे कार्यालय व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय |
| 2 | नामनिर्देशन दाखल करण्यासाठी अखेरचा दिनांक | 01/07/2025 ते 07/07/2025 | स.11.00 ते दु.3.00 पर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 3 | नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करणे | 07/07/2025 | सायं. 04.00 वा. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 4 | छाननीचा दिनांक | 08/07/2025 | सकाळी 11.30 ते छाननी संपेपर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 5 | वैध नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | 09/07/2025 | दुपारी 01.00 वाजता | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 6 | ज्या दिनांकापर्यंत उमदेवारी मागे घेता येईल असा दिनांक | 09/07/2025 ते 23/07/2025 | स.11.00 ते दु.3.00 वा. पर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 7 | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक आणि चिन्हांचे वाटप | 24/07/2025 | स.11.30 वा. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 8 | मतदान ज्या दिनांक, वेळेस, कालावधीत घेण्यात येईल तो दिनांक, वेळ कालावधी आणि ठिकाण | 02/08/2025 | स.8.00 ते दु.4.00 वा.पर्यंत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 9 | मतमोजणी दिनांक, वेळ आणि ठिकाण | 02/08/2025 | मतदान संपल्यानंतर लगेचच | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |
| 10 | निकाल जाहीर करण्याचा दिनांक | 02/08/2025 | मतमोजणी नंतर लगेचच | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड |

**टीप: 1. वरीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम छाननीच्या टप्प्यानंतर मतदान व मतमोजणीचा दिवस वगळून शासकीय / सार्वजनिक सुट्टयांखेरीज सुरु राहील.**
**2. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता: जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, पत्ता- सहकार भवन, भू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड**

स्थळ : **नांदेड**
दिनांक : 30/06/2025.

स्वाक्षरीत/-
**( श्रीमती एस. एन. पटके )**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**जिल्हा कोषागार कर्मचारी सहकारी पतसंस्था म.जि.नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रात नाव करावे -आ.केराम

**किनवट (प्रतिनिधी)–** महात्मा ज्योतिबा फुले शाळेचे अनेक विद्यार्थी आजवर डॉक्टर, इंजिनियर तर झालेच आहेत. शिवाय या शाळेचे विद्यार्थी इस्त्रोमध्ये शास्त्रज्ञ म्हणूनही काम करताहेत. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थ्यांनी आपलं उज्ज्वल भवितव्य निवडून देशपातळीवर विविध क्षेत्रात आपले नाव गाजवावे, असे प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले.

गोकुंदा येथील महात्मा ज्योतिबा फुले आणि मातोश्री कमलताई ठमके विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने शनिवारी दि.२८ गोपीकिशन मंगल कार्यालयात आयोजित राजर्षी शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.

याप्रसंगी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे वरिष्ठ



अन्वेषक गोवर्धन मुंडे, एन. सी. सी. ५२ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिग ऑफिसर कर्नल के. दिलीप रेड्डी, गटशिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, हदगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे, केंद्रप्रमुख उत्तम कानिंदे, संस्थेचे सचिव अभियंता प्रशांत ठमके, कोषाध्यक्षा प्राचार्या शुभांगी ठमके यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रकल्प कार्यालयाच्या नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश या योजनेतून एम.के.टी. इंग्लिश स्कूल मधील तालुक्यातून प्रथम आलेली आदिती अशोक ढगे, नीट मधील यशवंत सुयश प्रशांत ठमके, रामदास सुदाम जायभाये, संकल्प प्रवीण वाघमारे, जे.ई.ई. मधील यशवंत आय.आय. टी. वाराणसी प्रविष्ठ भूपेश विनोद राठोड व एन. आय. टी. नागपूर प्रविष्ठ आयुष नागसेन पाटील यांच्यासह इयत्ता दहावी, बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य घेणारे, काही विषयांत पैकीच्या पैकी गुण घेणारे, देश पातळीवरील विविध स्पर्धा परिक्षांमध्ये यशवंत ठरलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह शाल, पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त अवांतर ज्ञान गृहण करावे, अभ्यासक्रमात दर्शविलेल्या उदाहरणानुरूप प्रत्यक्ष जीवनातील समस्यांची कशी सोडवणूक करता येईल, हे ठरवून आपले करिअर निवडावे, असा सल्ला सहायक जिल्हाधिकारी झेनित चंद्रा दोन्तुला यांनी याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना दिला.

प्राचार्य प्रमोद मुनेश्वर यांनी प्रास्तविक व पर्यवेक्षक संतोष बैसठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. सुबोध सर्पे यांनी आभार मानले. यावेळी अनेक मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उप प्राचार्य राधेश्याम जाधव, उप मुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक रघुनाथ इंगळे, मनोज भोयर यांचे सह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कोम्बींग ऑपरेशन दरम्यान १२७ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती

**नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत शहरात २९ जून रोजी कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. त्यात १२७ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती घेण्यात आली असून आर्म ॲक्ट द्वारे ४ गुन्हेगारांवर गुन्हा नोंद करण्यात आला. वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे.

शहरामध्ये सराईत गुन्हेगारांची तपासणी करून कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी २९ जून रोजी केलेल्या कोम्बींग ऑपरेशनमध्ये १२७ सराईत गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. १५ गुन्हेगारांना जामीनपात्र वॉरंट व ९ गुन्हेगारांना अजामीनपात्र वॉरंट तर ४ गुन्हेगारांना समन्स तसेच ४ जणांवर आर्म ॲक्टद्वारे गुन्हा नोंदविण्यात आला. एक प्रोव्हीबीशन केस, एका गुन्हेगारावर कलम १२२ मपोका नुसार कारवाई तर एका फरारी आरोपीस अटक करण्यात आले. या कोंबिंग ऑपरेशन मध्ये स्थानिक गुन्हे शाखामधील अधिकारी, अंमलदार तसेच शहरातील पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार, अशा एकूण १४९ अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला.

## सकल दिव्यांग संघटनेच्यावतीने आमदारांच्या घरासमोर अर्धनग्न भीक मागो आंदोलन




**नांदेड (प्रतिनिधी)–** आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गतचा दिव्यांगांसाठीचा दरवर्षीचा ३० लक्ष रूपये निधी दरवर्षी खर्च करावा, संजय गांधी निराधार योजनेच्या मानधनात वाढ करावी, यासह अन्य मागण्यांसाठी २९ रोजी बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य, दिव्यांग वृद्ध निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र राज्य आणि सकल दिव्यांग संघटनेच्या वतीने आमदार हेमंत पाटील आणि आमदार बालाजी कल्याणकर यांच्या निवासस्थानासमोर अर्धनग्न अवस्थेत भीक मागो आंदोलन करण्यात आले.

आमदार बालाजी कल्याणकर यांनी आंदोलनकर्ते दिव्यांगांची भेट घेऊन निवेदन स्विकारले आणि उद्यापासून सुरु होत असलेल्या अधिवेशनात मी दिव्यांगांच्या हक्कासाठी आवाज उठविणार असल्याचे म्हणत आमदार स्थानिक क्षेत्र विकास निधीतील दिव्यांगांचा निधी इतरत्र कुठेही न वळविता दरवर्षी खर्च करणार असल्याचे आश्वासन दिले. तसेच संजय गांधी निराधार मानधन वाढीसाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर मोर्चा आमदार हेमंत पाटील यांच्या घराकडे गेला. प्रचंड घोषणाबाजी आणि अर्धनग्न अवस्थेत भीक मागो आंदोलनाने तरोडा नाका परीसर, मालेगाव रोड परीसर दणाणून गेला.

आमदार हेमंत पाटील हे उपस्थित नसल्यामुळे काहीकाळ संतप्त दिव्यांगांनी आक्रोश केला. या आंदोलनात दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष राहुल सिताराम साळवे, चंपतराव डाकोरे, आदित्य पाटील, व्यंकट कदम, सुनिल जाधव, शिवराज बंगरवार, संभाजी सोनाळे, शिवाजी सुर्यवंशी, पिंटुभाऊ राजेगोरे, प्रेमकुमार वैद्य,रवि कोकरे, प्रदिप हणवते, मिलिंद सितळे, शेख खालेद, माधव हिवराळे, सय्यद आतिक, बालाजी इस्रेवार आरळीकर, शेख गौस, कार्तिक कुमार भरतिपुरम, सय्यद आरिफ, किरणकुमार न्यालापल्ली, नारायण तांडलवार, शेख माजीद, बालाजी ढगे, मिटकर, सईद वैद्य मौलाना, शेख सादिक, शेख मतीन, भोजराज शिंदे, सुनिल कांबळे, शेख सुफियान, सिद्धोधन गजभारे, प्रशांत हणमंते, राजु इराबत्तीन, शेख आलीम, बालाजी ढगे, नवघडे, मिटकरे, भाग्यश्री नागेश्वर, अफरोजा खानम,कल्पना सकते, शेख जैनाज, लोणेबाई व मुकबधीर कर्णबधिर दिव्यांगांसह हजारो सकल दिव्यांग सहभागी झाले होते.




**नांदेड–** भाजपा महानगराध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या नेतृत्वाखाली व माजी महापौर प्रतिनिधी विजय येवनकर यांच्या संयोजनात भाजपा महानगर कार्यालय, नाना नानी, शिवाजी नगर नांदेड येथे मन की बात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. सचिन उमरेकर, विजय गंभीरे, शितल खांडील, अनिलसिंह हजारी, दयानंद वाघमारे, राज यादव, अक्षय अमिलकंठवार, अमित वाघ, साई महाजन, शिवकुमार बैनवाड व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## राज्यस्तरीय स्वच्छता अभियानात सगरोळीच्या छत्रपती शिवाजी हायस्कूलचा सन्मान

**सगरोळी (प्रतिनिधी)–** गांधी तीर्थ स्वच्छ शाळा या राज्यस्तरीय अभियानात राज्यातील ३५४ शाळांनी सहभाग घेतला होता. राज्यस्तरीय अंतिम फेरीत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शाळेला सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि ३१,०००/- (एकतीस हजार रुपये) धनादेश देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान शाळेच्या वतीने मुख्याध्यापक संभाजी गायकवाड व कैलास कोदळे यांनी स्वीकारला.

या स्पर्धेत छत्रपती शिवाजी हायस्कूलची अंतिम फेरीसाठी निवड झाली. विशेष म्हणजे, शाळेच्या स्वच्छता उपक्रम, शालेय परिसरातील प्लास्टिक निर्मूलन, विद्यार्थ्यांचे प्रबोधन आणि श्रमदानाच्या माध्यमातून या शाळेने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे.



पुरस्कार वितरण समारंभात सागरमित्र अभियानाचे सहसंस्थापक विनोद बोधनकर, जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल, राज्य सल्लागार परिषद व ठढए समितीचे सदस्य अनिल बोरनारे आणि गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त व जैन इरिगेशन सिस्टिम्सचे अध्यक्ष डॉ. अशोक जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. कस्तुरबा गांधी सभागृह, जळगाव येथे २९ जून रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात सगरोळीच्या शाळेच्या कामगिरीचं सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## अवैध रेती वाहतूक करणारा हायवा पकडला

**नायगांव बाजार (प्रतिनिधी) –** अवैध रेती घेऊन जाणाऱ्या हायवा टिपरला वजीरगांव परिसरात बरबड्याचे मंडळ अधिकारी रोहीदास पवार यांनी पकडला. या प्रकरणी चालक आणि मालकावर कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून २ लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

येळी (ता. लोहा) येथुन २८ जून रोजी सायंकाळी ५ वाजता एम. एच. २६ बिई.३७९० या क्रमांकाचा हायवा अवैध रेती घेऊन जात असताना वजीरगाव, टाकळी शिवारात बरबडाचे मंडळधिकारी रोहीदास पवार यांनी थांबविला आणि रेती वाहतूक परवानगी पावती मागितली. पण पावती नसल्याने हायवा टिपर हे पुढील कारवाई करण्यासाठी घेऊन जात असताना रेती माफीयांनी चांगलाच वाद झाला असल्याची जोरदार चर्चा आहे.

## २ व ३ ऑगस्ट रोजी नांदेडमध्ये २० वे समरसता साहित्य संमेलन

**नांदेड (प्रतिनिधी) –** समरसता साहित्य परिषद महाराष्ट्राच्या वतीने २० वे समरसता साहित्य संमेलन नांदेड येथे २ व ३ ऑगस्ट रोजी होणार आहे. हे संमेलन श्री गुरुगोविंदसिंघजी साहित्यनगरी, भक्ती लॉन्स, मालेगाव रोड, नांदेड येथे होणार आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी पद्मश्री नामदेव कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घाटन भदंत डॉ. राहूल बोधी महाथेरो (अध्यक्ष, ऑल इंडिया भिक्खू महासंघ) यांच्या हस्ते होणार आहे. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून किशोर मकवाणा (अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, भारत सरकार) हे उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाच्या संयोजनासाठी विविध पदाधिकाऱ्यांचे योगदान असून, कार्यवाह माणिक भोसले, निमंत्रक शिवा कांबळे, सहनिमंत्रक डॉ. माया गायकवाड, प्रा. डॉ. धनंजय भिसे, डॉ. राजेश कापसे, महाव्यवस्थापक अभय कोटलवार, सहव्यवस्थापक राजेश मांजरमकर हे परिश्रमपूर्वक नियोजन करत आहेत. संमेलन यशस्वी व्हावे यासाठी विविध समित्याही गठित करण्यात आल्या आहेत.

या संमेलनात शहरातून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या संमेलनात व्याख्यान, विविध परिसंवाद, साहित्यिक संवाद, मुलाखती, विद्यार्थी वक्त्यांचे ग्रंथपरिचय सत्र, कविसंमेलन, खुला काव्यमंच, गझल मंच तसेच रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रम होणार आहेत. संमेलनस्थळी ग्रंथ प्रदर्शन देखील भरविण्यात येणार आहे.

सुमारे ६०० हून अधिक साहित्यिक, लेखक, कवी, विचारवंत व साहित्यरसिक महाराष्ट्रभरातून या संमेलनात सहभागी होणार आहेत. समरसता साहित्य परिषदेने गेल्या अनेक वर्षांत समतावादी, मूल्याधिष्ठित व सामाजिक प्रश्नांना स्पर्श करणाऱ्या विचारप्रधान साहित्य परंपरेची जपणूक केली आहे. हीच परंपरा पुढे नेणाऱ्या या २० व्या संमेलनाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी संपूर्ण नांदेड शहर आणि साहित्यप्रेमी सज्ज झाले आहेत. नांदेडकरांसाठी ही एक संस्मरणीय साहित्यिक व सांस्कृतिक पर्वणी ठरणार आहे, असेही स्वागताध्यक्ष खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सांगितले.

## एनटीसीच्या उपकेंद्रातील पावर ट्रान्सफॉर्मेर क्षमतेत वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील एनटीसी ३३/११ के.व्हि. उपकेंद्राच्या पावर ट्रान्सफार्मरच्या क्षमतेत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांना योग्य दाबाने, अखंडित व दर्जेदार वीज पुरवठा होणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजने अंतर्गत अतिभारीत असलेले पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविण्यात आली आहे. ३३/११ केव्ही उपकेंद्रातील ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून १० एमव्हीए करण्यात आली ज्यामुळे एनटीसी उपकेंद्र परिसरातील विपश्यना केंद्र, नांदेड महानगरपालिकेचा कोटीतीर्थ येथील पंप हाऊस, खडकपुरा, दुलेशाह रहमान नगर, समीरा बाग, जीएम कॉलनी, मामा येवले नगर, असलम नगर, असलम ग्राउंड, खडकपुरा चाळ व सैलाब नगर भागातील जवळपास १३०० ग्राहकांना आता योग्य दाबाने वीजपुरवठा होत आहे.

## रामनगर, आनंदसागर आणि नारायणनगर भागातील रहिवाशांचे प्रचंड हाल

**'गोदातीर समाचार'चा ग्राउंड रिपोर्ट**

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** शहराच्या तरोडा बुद्रुक भागातील आनंदसागरनगर, नारायणनगर विस्तारीत आणि रामनगर या भागात जवळपास शंभरहून अधिक बंगले बांधण्यात आले आहेत. विशेष करून कर्मचारी वर्ग प्रामुख्याने या भागात वास्तव्यास आहेत. मुख्य रस्त्यापासून दोनशे मीटर अंतर असलेल्या या नगरवासीयांना पावसाळ्यात एवढेच अंतर कापण्यासाठी अर्धा तास लागतो. या भागात अनेकवेळा मागण्या करून अर्धवट ड्रेनेज लाईनचे काम करण्यात आले. ड्रेनेजवर झाकण नसल्याने कधीही दुर्घटना होऊ शकते याला जबाबदार कोण असा प्रश्न या भागातील नागरिकांनी उपस्थित केला आहे. नळ जोडणी नाही, निकृष्ट केलेली ड्रेनेज लाईन जोडणी नाही, दिवाबत्तीची सुद्धा सोय नाही तसेच या परिसरात घंटागाडीचे या नागरिकांना महिनोबाद दर्शन होत नाही.

या भागाचे आमदार बालाजीराव कल्याणकर, या प्रभागाचे माजी नगरसेवक यांना या भागातील नागरिकांनी अनेकवेळा आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. सर्वजण महानगरपालिकेचा वेळेवर कर भरतात, परंतु त्या बदल्यात त्यांना कुठलीही महापालिका सोयी सुविधा देत नाही. हे




प्रत्यक्ष या भागात राहणाऱ्या नागरिकांनी गोदातीर समाचारशी बोलताना संताप व्यक्त केला.

आमदार बालाजीराव कल्याणकर यांनाही अनेकवेळा निवेदने दिली, परंतु त्यांनीही या भागाकडे दुर्लक्ष केले. लवकरच या भागातील नागरिक, महिला, विद्यार्थी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजित गोपछडे आणि पालकमंत्री अतुल सावे यांना भेटून निवेदन देणार आहेत.

येणाऱ्या आठ दिवसात जर या भागातील समस्यांवर काही प्रशासनाकडून तोडगा काढण्यात नाही आला तर जिल्हाधिकारी कार्यालयावर या भागातील नागरिक, महिला मोर्चा काढण्याच्या तयारीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी लक्ष्मीकांत पवार, प्राध्यापक बाळासाहेब नरवाडे, विशाल जाधव, ताराबाई पवार, रघुनाथ वाळकीकर, रविचंद्र नेमाडे, सुभाषराव कल्याणकर, पुंडलिक नरवाडे, कविता गायकवाड, सुशिलाबाई रायठक, अरुणाबाई डोईजड, प्रेमीलाबाई कल्याणकर, एडवोकेट भीमराव पवार, ॲड. संकेत पोहरे, पुरुषोत्तम कांबळे, संजय खोंडे, संतोष पाटील यांची यावेळी उपस्थिती होती.

मराठवाडा शिक्षण संस्था, नांदेड, संचालित
राजर्षी शाहू ज्यू. कॉलेज वसंतनगर, नांदेड
कोणताही माणूस आपल्या कार्यकौशल्यावर आपले जीवन घडवत असतो जीवनात आलेल्या प्रत्येक सवालाचा जबान शोधत असतो, जबाब छान दिले तर तो लाजवाब होत असतो.
असे आमचे लाडके

मुख्याध्यापक माननीय
बालाजी मारोतीराव हंगरगे
यांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा
शुभेच्छूक : सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व
आजी माजी विद्यार्थी राजर्षी शाहू ज्यू. कॉलेज वसंत नगर नांदेड

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com